# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १९ जून, २०१९ / ज्येष्ठ २९, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| (१) उद्योग व खनिकर्म मंत्री<br>(२) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(३) पणन व वस्त्रोद्योग मंत्री<br>(४) सहकार मंत्री<br>(५) सामाजिक न्याय मंत्री<br>(६) आदिवासी विकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५३**

---

### राज्यात मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळण्यासाठी अर्जातील त्रुटी दुर करण्याबाबत

**(१) * १३४९८५ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.संजय धोटे (राजूरा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी म्हणून शासनाने महावितरणाच्या माध्यमातून मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना राबविली असून उक्त योजनेचा लाभ मिळण्यासाठी माहे डिसेंबर, २०१८ पासून पात्र शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विशेषतः उस्मानाबाद, चंद्रपूर, अमरावती, सोलापूर, सांगली, भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उक्त योजनेचा लाभ मिळावा यासाठी अर्ज केले होते, परंतू प्रशासनाने अर्जामध्ये त्रुटी असल्याचे कारण दाखवून ३४ हजाराहून अधिक शेतकऱ्यांचे अर्ज बाद केल्याने उक्त योजनेपासून शेतकऱ्यांना वंचित राहावे लागणार असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) तसेच काही शेतकऱ्यांनी उक्त योजना न राबविता पारंपारिक पध्दतीने वीज जोडणी देण्याबाबत शासनाकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने शेतकऱ्यांनी उक्त योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्जातील त्रुटी दुर करुन तात्काळ योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) ऊर्जा विभागाच्या दि.१५.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये, राज्यात शेतक-यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे या व इतर उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने, पारेषण विरहीत १ लक्ष सौर कृषीपंप, टप्प्या टप्प्याने आस्थापित करण्यासाठी “मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना” सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यात म्हणजेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण २५००० नग सौर कृषीपंप महावितरणमार्फत आस्थापित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार शेतक-यांकडून On-line पोर्टलवर अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार दि.२.६.२०१९ अखेर एकूण १,५५,४९७ अर्ज शेतक-यांकडून प्राप्त झाले. सदर योजने अंतर्गत लाभार्थी निवडीच्या निकषानुसार प्राप्त अर्जापैकी एकूण ५४,८४२ अर्ज अपात्र ठरविण्यात आले आहेत. उस्मानाबाद, चंद्रपूर,

अमरावती, सोलापूर, सांगली, भंडारा जिल्हयातील एकूण १९६७८ प्राप्त अर्जांपैकी ६०७५ अर्ज अपात्र ठरले आहेत.

(३) होय.

(४) योजनेच्या पात्रतेच्या निकषांनुसार शेतक-यांकडे शाश्वत जलस्त्रोत उपलब्ध नसणे, पारंपारिक पध्दतीने कृषीपंपाला वीज पुरवठा असणे, अयोग्य ७/१२ उतारा जोडणे, चुकीचे आधार कार्ड जोडणे, सामूहिक विहिरीवरील व सामूहिक शेती मधील इतर भागीदार शेतक-यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर न करणे, भूजल सर्वेक्षण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर न करणे, इत्यादी कारणास्तव संबंधित अर्ज अपात्र ठरविण्यात आले आहेत. अपात्र अर्जदार शेतकऱ्यांनी पात्रतेच्या निकषांची पूर्तता केल्यास त्याच्या अनुज्ञेयतेनुसार विचार करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांनी केलेल्या विविध मागण्यांबाबत

**(२) * १३८२७३ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी देऊन सातवा वेतन आयोग लागू करणे तसेच दर महिन्याला वेळेवर वेतन मिळावे इत्यादी विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने अप्पर आदिवासी आयुक्तांना निवेदन देऊन दिनांक ८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.

स्वाभिमानी शिक्षक व शिक्षकेतर संघटनेने अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत दिनांक ६ जून, २०१९ पासून आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

(२) संघटनेच्या मागण्यांबाबत दिनांक ६ जून, २०१९ रोजी मा.मंत्री महोदय, आदिवासी विकास यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. अन्य विभागांशी (वित्त विभाग, विधी व न्याय विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, सामान्य प्रशासन विभाग) संबंधित मागण्यांबाबत त्या विभागांचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे. सदर मागण्यांबाबत संबंधित विभागांकडे पाठपुरावा करुन सकारात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु असून संघटनेने आंदोलन स्थगित केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील सात जिल्हयात कृषि समृध्दी समन्वयित प्रकल्पात (केम) झालेला गैरव्यवहार

**(३) * १३७०२९ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा इत्यादी जिल्हयामध्ये शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विविध योजना व प्रत्यक्ष लाभ स्वरूपात या कृषी समृध्दी समन्वयीत प्रकल्प (केम) अंतर्गत राबविण्यात येत असून, यामध्ये केवळ सात महिन्यामध्ये प्रकल्पातील रुपये १०३ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उक्त सहा आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये शासनाच्या केम (कृषी समृध्दी समन्वयीत कृषी विभाग) प्रकल्पातून सन

२०१६-१७ या कालावधीत विविध कामांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पातून रुपये ९ कोटी ८८ लाख इतक्या रुपयांचा गैरव्यवहार झाला असून, त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) समन्वयीत कृषि विकास प्रकल्पांतर्गत माहे एप्रिल २०१८ ते माहे मार्च २०१९ या कालावधीत रु.१०८.३८ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) समन्वयीत कृषि विकास प्रकल्पामध्ये सन २०१६-२०१७ या कालावधीत प्रकल्पातील कामांमध्ये वित्तीय अनियमितता झाली असल्याने संपूर्ण प्रकल्पामध्ये सहभागी असलेल्या शासकीय अधिकारी, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटी पद्धतीने नेमण्यात आलेले कंत्राटी व्यक्ती, संस्था व खाजगी व्यक्ती यांची पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांच्यामार्फत उघड चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहराला वीज पुरवठा करणाऱ्या टाटा पॉवर रिसिव्हींग स्टेशनमध्ये झालेला स्फोट

**(४) * १३८५९९ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराला वीज पुरवठा करणाऱ्या टाटा पॉवर रिसिव्हींग स्टेशनमध्ये दिनांक २१ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास मोठा स्फोट झाल्याने नायगाव, परळ, लालबाग, भायखळा व माझगांव येथील वीज पुरवठा खंडीत झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्फोटामुळे या परिसरात असणाऱ्या रुग्णालयातील अनेक शस्त्रक्रिया रद्द कराव्या लागल्याने रुग्णालयातील रुग्णांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून नजिकच्या परिसरातील नागरिकही त्रस्त झाले असल्याने टाटा पॉवरच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करुनही त्याची दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी सत्वर कार्यवाही करण्याबाबत तसेच तक्रारींची दखल न घेता मनमानी कारभार करणाऱ्या टाटा पॉवरच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दिनांक २१ एप्रिल, २०१९ रोजी सकाळी १०.५० वाजता टाटा पॉवरच्या परळ रिसिव्हिंग स्टेशनमध्ये ११० केव्ही ब्रेकरमध्ये विद्युत स्फोट (Flashover) झाल्याने संपूर्ण परळ रिसिव्हिंग स्टेशनमधील काम बंद पडले. यामुळे नायगाव, परळ, लालबाग, भायखळा व माझगांव येथील काही भागांमधील वीज पुरवठा खंडित झाला.

(२), (३), (४) व (५) टाटा पॉवर रिसिव्हिंग स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी तातडीने कृती करत समस्या शोधली आणि ग्राहकांसाठी वीज पुरवठा पूर्ववत केला. सकाळी १०.५० च्या सुमारास समस्या निर्माण झाली आणि ११.१० च्या सुमारास ट्रान्सफॉर्मरच्या क्षमतेनुसार ६० टक्के वीज पुरवठा पुन्हा सुरु झाला. सदोष उपकरणे काढून इतर उपकरणांच्या सुरक्षिततेची खातरजमा केल्यानंतर दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास उर्वरित वीज पुरवठाही पूर्ववत झाला. या बिघाडात कोणतीही मानवी चूक नव्हती आणि सर्व उपकरणांची रुढ नियमांप्रमाणे योग्य देखभाल राखली जाते.

संबंधित उपकरणामधील बिघाडाबाबत टाटा पॉवर कंपनीने ओरिजनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर (OEM) समोर मांडण्यात आला आहे आणि याची सखोल चिकित्सा करण्यासाठी हे उपकरण ओईएमकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. ११० केव्ही परळ रिसिव्हिंग स्टेशनमधील काम ज्या उपकरणामुळे बंद पडले होते त्या उपकरणातील दोषाची चिकित्सा करण्यासाठी टाटा पॉवर आणि ओईएममधील तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

-----------------

## मुंबई पश्चिम उपनगरातील, 'अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.' या कंपनीने ग्राहकांची केलेली फसवणूक

**(५) * १३५२४८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील, वीज पुरवठा करणाऱ्या 'अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.' या कंपनी व्यवस्थापनाने माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान नियमित दरापेक्षा १० ते २० टक्क्यापर्यंत वाढीव दराची वीज देयके पाठविल्याच्या निषेधार्थ हजारो ग्राहकांनी राजकीय पक्षाच्या नेतृत्वाखाली अदानी इलेक्ट्रिसिटीच्या वांद्रे येथील कार्यालयावर, दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास तसेच माहे जानेवारी, फेब्रुवारी २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढून तीव्र आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात वीज नियामक आयोगाने नेमलेल्या व्दिसदस्यीय चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत, त्याअनुषंगाने वाढीव वीज दर कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मुंबई उपनगरातील ग्राहकांना पाठविण्यात आलेल्या वाढीव वीज देयकाचे कारणास्तव नोव्हेंबर, २०१८ व डिसेंबर, २०१८ मध्ये आंदोलन झाले होते.

(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाद्वारे मुंबई शहर व उपनगरातील ग्राहकांना पाठविण्यात आलेली वाढीव वीज देयके आणि त्यासंबंधीच्या तक्रारींची शहानिशा करण्यासाठी व अशा प्रकारच्या घटना पुन्हा होऊ नयेत म्हणून उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक १० डिसेंबर, २०१८ च्या अधिसूचनेद्वारे द्विसदस्यीय समितीची नेमणूक करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नेमलेल्या समितीचा अहवाल अद्यापपर्यंत आयोगास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक १० डिसेंबर, २०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे द्विसदस्यीय समिती नेमली होती. समितीची कार्यकक्षा मुंबई शहर व मुंबई उपनगरातील वीज ग्राहकांच्या वीज बिलातील बदलाबाबत अभ्यास करावयाचा आहे.

सदर समितीने मुंबईत वीज पुरवठा करणाऱ्या चारही कंपन्यांकडून तक्रारी संदर्भात अनुषंगिक माहिती संकलीत करणे, सदर माहितीचा तुलनात्मक विश्लेषण करणे तसेच प्राप्त झालेल्या तक्रारींची शहानिशा करुन तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे इत्यादी बाबी पडताळणे आवश्यक आहे.

समितीच्या कामांचे स्वरुप व क्लिष्टता लक्षात घेऊन, तसेच समितीच्या एका सदस्याच्या आरोग्यविषयक कारणास्तव काही कालावधीसाठीची अनुपस्थिती लक्षात घेऊन आयोगाने दिनांक २७ मार्च, २०१९ रोजी सदर समितीवर एका नवीन तांत्रिक सदस्याची नेमणूक करुन सदर समितीस दिनांक ३१ मे, २०१९ पर्यंतची मुदतवाढ दिली. या समितीचा अहवाल अंतिम टप्प्यात असून तो लवकरच आयोगास सादर होणे अपेक्षित आहे.

-----------------

## राज्यातील बोगस मागासवर्गीय सहकारी औद्योगिक संस्थांविरोधात कारवाई करण्याबाबत

**(६) * १३६५४५ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय सहकारी औद्योगिक संस्थामध्ये मोठ्या प्रमाणात बोगस सभासद नोंदणी केलेल्या ८२ संस्थांवर राज्य शासनाकडून घेतलेले अनुदान जमीन महसूल अधिनियमातंर्गत वसूल करण्यासंदर्भात व सदर बोगस संस्थांविरोधात कारवाई करुन त्यांची नोंदणी रद्द करुन या संस्थांवर अवसायक नेमण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनास माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कणकवली (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील दिगवळे भिमरत्न मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थेमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार उपरोक्त मागासवर्गीय सहकारी औद्योगिक संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश खाडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सहकार विभागामार्फत योग्य ती कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचा आरोग्य विमा काढण्याबाबत

**(७) * १३७८२० श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या सुमारे ६० हजार विद्यार्थ्यांना आरोग्य कवच मिळण्याकरिता शासनाने माहे नोव्हेंबर, २०११ वा त्यादरम्यान वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा राजीव गांधी विमा योजनेअंतर्गत विमा उतरविण्यात यावा असा निर्णय घेण्यात येऊन देखील आजतागायत या योजनेअंतर्गत एकाही आदिवासी विद्यार्थ्यांचा विमा काढण्यात आला नसल्याची बाब माहितीच्या अधिकारात माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, यासंदर्भात जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२) व (३) वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांचा राजीव गांधी विमा योजनेतंर्गत विमा काढण्याबाबत आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ११.११.२०११ मध्ये नमूद आहेत. तथापि, याबाबत आदिवासी विकास विभागाचे शासन शुध्दीपत्रक दिनांक २०.५.२०१५ अन्वये राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेचा लाभ शासकीय वसतीगृहातील संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनींना देण्याबाबत वसतीगृहांचे गृहपाल हे संबंधित शाळा, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य यांच्याकडे पाठपुरावा करतील असे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना (राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना ऐवजी राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना) शासन निर्णय दिनांक १.१०.२०१३ नुसार शालेय शिक्षण विभागाकडून राबविण्यात येते.

शासकीय वसतीगृहातील विद्यार्थी ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये शिकत आहेत त्या संस्थेमार्फत राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत लाभ मिळण्यासाठी शिक्षणअधिकारी यांचेकडे अर्ज करणे अपेक्षीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरणकडून वीज वितरणाच्या प्रक्रियेदरम्यान होणाऱ्या वीज गळती व चोरीला आळा घालण्याबाबत

**(८) * १३६८९१ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे अडीच कोटी वीज ग्राहकांना वीज पुरवण्याची जबाबदारी महावितरण या सरकारी वीज कंपनीवर असून महावितरण वीज वितरण करत असताना वीजचोरी, तांत्रिक अडचण, तसेच वीज वाहिन्यांचे जाळे मोठे असल्याने १३-१४ टक्के विजेची गळती होत असल्याने ग्राहकांना प्रती युनिटमागे १ रुपया भुर्दंड पडत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने खरेदी केलेल्या एकूण वीजेपैंकी १६-१७ टक्के म्हणजे सुमारे १५ हजार दशलक्ष युनिट वाया जात असून ग्राहकांपर्यंत केवळ एक लाख दशलक्ष युनिट वीज पोहचत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज गळती, तांत्रिक अडचणी व वीज चोरीला आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. मा. आयोगाने आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी मंजूर केलेली वीज गळतीचे लक्ष १३.४९% आहे. सदर वीज गळतीचे लक्ष हे मा.आयोगाने नियामक प्रक्रियेअंती मंजूर केले आहे. वीज

गळती ही कुठल्याही वीज प्रणालीचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे वीजेची गळती होत असल्याने ग्राहकांना प्रति युनिटमागे १ रुपया भुर्दंड पडतो असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. महावितरणची माहे मार्च २०१९ पर्यंतची वितरण हानी १३.६४ % इतकी आहे.

(२) आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये असलेल्या १३.६४ % वितरणहानी मुळे १८०६५ (द.ल.यु) हानी झालेली आहे. यामध्ये तांत्रिक हानी व वाणिज्यिक हानीचा समावेश आहे.

(३) तांत्रिक हानी व वाणिज्यिक हानी कमी करणेसाठी महावितरण कंपनीतर्फे विविध उपाययोजना राबविण्यात येतात. केंद्रिय वीज बिल प्रणालीद्वारे (Centralized Billing) सर्व ग्राहकांना योग्य बिल देण्याकरिता यंत्रणा सशक्तीकरण, वीज चोरीवर आळा घालण्याकरिता विविध उपाययोजना तसेच वितरण प्रणालीत सुधारणा करणेसाठी विविध पायाभूत सुधारणा योजना राबविल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतचा टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांच्या अहवालाबाबत

**(९) * १३४८७८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर),**

**श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेने राज्यातील धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतचा अहवाल दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला आहे, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालात धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत करण्यात आलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) धनगर समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स या संस्थेने दिलेला अहवाल पुढील कार्यवाहीसाठी राज्याच्या मा.महाअधिवक्त्यांकडे सोपविण्यात आल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) राज्यातील धनगर समाजाच्या आरक्षणासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस करणारा प्रस्ताव पाठविला आहे काय, असल्यास, उक्त प्रस्तावास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(५) अद्याप धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे शिफारस करून पाठविला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२), (३), (४) व (५) टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी दि.३१ ऑगस्ट, २०१८ रोजी धनगर समाजाबाबतचा त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे. यासंदर्भात मा.मंत्रिमंडळाच्या

दि.२७.०२.२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांचेकडून धनगर समाजाबाबत शासनास प्राप्त झालेल्या संशोधन / सर्वेक्षण अहवालाच्या अनुषंगाने धनगर समाजाच्या विविध मागण्यांवर विचार करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने शासन निर्णय दि.०१.०३.२०१९ अन्वये मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर मंत्रिमंडळ उपसमितीची पहिली बैठक दि.०२.०३.२०१९ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये काही कायदेशीर मुद्यांबाबत मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे अभिप्राय घेण्याबाबतचा निर्णय झाला. त्याअनुषंगाने विधी व न्याय विभागामार्फत मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

-----------------

## तारापूर (जि.पालघर) येथील गुजरात गॅस लिमिटेड या कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(१०) * १४०२६४ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) येथील गुजरात गॅस लिमिटेड या कंपनीची पाईपलाईन टाकताना खोदकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी दिनांक २३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास एम.आय.डी.सी. ची सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन फोडल्यामुळे तिच्या दुरुस्तीकरिता पाणी पुरवठा बंद करण्यात आल्याने एम.आय.डी.सी.मधील कारखान्यांना २ दिवस पाणीपुरवठा करण्यात आला नसल्याने सदर कारखान्यांचे उत्पादन बंद झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुजरात गॅस लिमिटेड कंपनीच्या निष्काळजीपणामुळे गत सहा महिन्यात तीन वेळा एम.आय.डी.सी.मधील पाण्याची पाईपलाईन फुटल्याने उक्त परिसरातील उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गुजरात गॅस कंपनीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) नैसर्गिक वायु वाहिनी टाकताना गुजरात गॅस लि.या कंपनीकडून खोदकाम करतांना दि. २३/०३/२०१९ रोजी सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी तुटली होती. तिच्या दुरुस्तीच्या कालावधीमध्ये दि.२३/०३/२०१९ व दि.२४/०३/२०१९ रोजी संपूर्ण औद्योगिक क्षेत्राचा पाणीपुरवठा बंद न होता. तर फक्त संप क्र.३ च्या परिक्षेत्रातील एल, एम व एन या विभागातील कारखानदारांचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात आला होता.
(२) मे. गुजरात गॅस लिमिटेड यांनी महामंडळाच्या जमिनीखालील असलेल्या जलवाहिन्या तसेच अनेक प्रकारच्या सेवा वाहिन्या, केबल यांची कामे जेसीबी यंत्राव्दारे खोदकाम न करता, ड्रिलींगव्दारे कामे करण्यात येत आहे. तसेच परिसरातील उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) तारापूर औद्योगिक क्षेत्र सन १९७२ साली विकसीत करण्यात आले आहे. तसेच सदर क्षेत्राच्या जमिनी खालून जलवाहिन्या, इलेक्ट्रीक केबल, सांडपाणी एकत्रिकरण वाहिन्या, ओ. एफ.सी. केबल, टेलिफोन केबल इत्यादी जाळे गेलेले आहे. त्यामुळे त्यांच्या स्थान निश्चित कळत नाही. त्यामुळे गुजरात गॅस कंपनी लि. यांच्याकडून दि. २३/३/२०१९ रोजी सांडपाणी वाहिनी फुटण्याचा प्रसंग घडला आहे.

दिनांक २३/०३/२०१९ रोजी सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन फुटल्यामुळे तिचे दुरुस्तीचे काम मे. गुजरात गॅस कंपनीसोबत झालेल्या करारनाम्यानुसार त्यांनी स्वखर्चाने महामंडळाच्या देखरेखीखाली दुरुस्ती करून दिले आहे. तसेच मे. गुजरात गॅस लिमिटेड यांना खोदकाम करतांना योग्य ती खबरदारी घेण्याबाबत नोटीसीव्दारे वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील गोदाकाठच्या गावांसाठी स्वतंत्र फिडर बसविण्याबाबत

**(११) * १४०११६ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील धरणातून नगर, मराठवाड्यासाठी पिण्याच्या पाण्याचे आवर्तन सोडताना गोदाकाठच्या गावांची वीज वारंवार खंडीत होत असल्यामुळे या गावांमध्ये स्वतंत्र फिडर बसविण्याचा प्रस्ताव निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास निधी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, गोदाकाठच्या गावांना स्वतंत्र फिडर बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

नाशिक जिल्हयातील धरणातून नगर, मराठवाडयासाठी पिण्याच्या पाण्याचे आवर्तन सोडताना पाण्याचा अनावश्यक उपसा टाळण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार गोदावरी नदीकाठच्या परिसरातील ११ के.व्ही. वाहिन्यांचा वीज पुरवठा उपकेंद्रातून आवर्तन काळात महावितरण कंपनीमार्फत खंडीत करण्यात येतो. त्यामुळे सदर वाहिन्यांवरील नदीकाठा व्यतिरिक्त असलेल्या इतर ग्राहकांचा वीजपुरवठाही खंडीत होतो. याकरिता स्वतंत्र फिडर बसविण्यासाठी महावितरण कंपनीच्या नाशिक शहर मंडळाकडून सन २०१९-२० या वर्षात जिल्हा नियोजन योजनेअंतर्गत रु.४४९.५२ लाख इतक्या रक्कमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून सदरहू प्रस्तावास जिल्हा नियोजन समितीकडून मान्यता व निधी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इन्फंट जीजस सोसायटीच्या (ता.राजुरा, जि.चंद्रपुर) वसतीगृहात आदिवासी मुलींचे झालेले लैगिक शोषण

**(१२) * १३५२२२ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील इन्फंट जिजस सोसायटीच्या वसतीगृहातील ९ ते १० वयोगटातील सुमारे १८ आदिवासी मुलींना गुंगीचे औषधे देवून लैंगिक शोषण केल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चंद्रपूर जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, आदिवासी आयुक्त यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनेची शासनाकडून सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संस्थाचालक व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच पिडीत मुलींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदरहू शाळेची नामांकित शाळा योजनेअंतर्गतची मान्यता रद्द करून विद्यार्थ्यांना इतरत्र शाळेत सामावून घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी आदिवासी मुला-मुलींच्या निवासी वसतीगृहातील सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर घटनेबाबत सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांच्याकडून कलम ३७६ एबी, लैंगिक अपराधापासून मुलांचे संरक्षण कायदा (पोक्सो ॲक्ट) कलम ४ व अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ अंतर्गत दिनांक १२.४.२०१९ रोजी पोलीस स्टेशन राजूरा येथे फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. सदर प्रकरण राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आले असून त्यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

(४) मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर अंतर्गत फौजदारी रिट याचिका क्रमांक ३४२/२०१९ या प्रकरणामध्ये झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने पिडीत सहा विद्यार्थीनींना विशेष बाब म्हणून प्रती विद्यार्थी रुपये ५०,०००/- याप्रमाणे एकूण रुपये ३,००,०००/- जिल्हा न्यायालयामध्ये जमा करण्यात आलेले आहेत. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून मनोधैर्य योजने अंतर्गत ८ मुलींच्या पालकांना प्रत्येकी रुपये १.०० लाख प्रमाणे मदत करण्यात आलेली आहे.

(५) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक १६.४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर शाळेची नामांकित योजनेअंतर्गतची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. इन्फंट जिजस पब्लिक स्कूल, राजूरा या नामांकित शाळेमधील प्रवेशित अनुसूचित जमातीच्या २९२ विद्यार्थ्यांचे समायोजन एकलव्य मॉडेल निवासी शाळा, देवाडा येथे करण्यात आले आहे. तसेच सदर शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत शालेय शिक्षण विभागास कळविण्यात आले आहे.

(६) आदिवासी मुला-मुलींच्या निवासी वसतीगृहातील सुरक्षेच्या दृष्टीने खालील उपाययोजना राबविण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास आणि सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना कळविण्यात आले आहे.

अ) मुलींच्या निवासी सर्व आश्रमशाळा व नामांकित शाळांमध्ये महिला अधिक्षक व सहायक स्टाफमध्ये महिला नियुक्त करण्यात याव्यात.

ब) सर्व आश्रमशाळा व नामांकित शाळांमध्ये सीसीटीव्ही लावून त्याचे रेकॉर्डींग जतन करण्यात यावेत.

क) स्वसंरक्षणासाठी सर्व आश्रमशाळा व नामांकित शाळांमधील विद्यार्थ्यांना संध्याकाळी शाळेनंतर ज्यूडो कराटे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक नेमावेत.
ड) विभागाच्या अधिपत्याखालील सर्व निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी "बॅड टच आणि गूड टच" याबाबत जागृती उपक्रम राबविण्यात यावा.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) अनेक आदिवासी पाडे अजूनही सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(१३) * १३९३७५ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागात वसलेले अनेक आदिवासी पाडे अजूनही रस्ते, शाळा, वीज, पाणी व रुग्णालय इ प्राथमिक सोयी-सुविधांपासून वंचित असल्याची बाब माहे एप्रिल २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे, चौकशीत काय आढळून आले,
(३) तसेच त्यानुसार सदर गाव व वाड्या-वस्त्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन पायाभूत सुविधांची कामे करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२) व (३) डहाणू तालुक्यात ८५ ग्रामपंचायती व १८४ महसूली गावे आहेत. तेथील राज्य मार्ग व जिल्हा मार्ग सुस्थितीत आहेत. त्यांची देखभाल व दुरुस्ती सार्वजिक बांधकाम उप विभाग, डहाणू यांच्या कडून करण्यात येते. सदर तालुक्यात ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत सन २०१६-१७ ते सन २०१८-१९ या कालावधीत रस्ते-२१८, समाजमंदीरे- ५, पाणीपुरवठा- १०३, पुल-४३, संरक्षक भिंत-६, शौचालय-१, स्मशानभुमी-१, गटार-१ व घाट-५ अशी एकूण ३८३ कामे करण्यात आली आहेत.

सदर तालुक्यात १४ शासकिय आश्रमशाळा, १३ अनुदानित आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या ४६० शाळा सुरु आहेत.

एप्रिल २०१९ पर्यंत सदर तालुक्यात २१६ पाडे व ३७२५ लाभार्थी वीजेपासून वंचित होते. सदर पाड्यांचे विद्युतीकरण सौभाग्य योजनेंतर्गत करण्यात आलेले आहे तर ४८६ ग्राहकांना विद्युत जोडणी देण्यात आली आहे.

डहाणू गटात ९ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ६६ आरोग्य उप केंद्रे, १५ भरारी पथके व २ जिल्हा परिषद दवाखाने आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोराडी औष्णीक वीज केंद्रातील (जि.नागपूर) युनिट क्रमांक ९ मध्ये झालेला अपघात

**(१४) * १३७३०७ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी औष्णीक वीज केंद्रातील (जि.नागपूर) युनिट क्रमांक ९ मध्ये दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास बाटम हॉपरमध्ये क्लिंकर फॉर्मेशनचे काम सुरू असताना गरम राखेच्या डक्टलाईनचे झाकण उघडतांना झालेल्या दुर्घटनेत चार जण गंभीर भाजल्याने त्यांना दवाखान्यात भरती करण्यात आले असता उपचारादरम्यान ठेकेदार श्री.यशोधन भोस्कर यांचा मृत्यू होऊन दोन मजूरांवर उपचार सुरू असल्याची बाब दिनांक ११ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबधित विभागातील अभियंत्याच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी निलंबित करण्यात आलेल्या अभियंत्याला पुन्हा कामावर रुजु करुन घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मृतकाच्या परिवारास आणि जखमी झालेल्या मजूरांना शासनाकडून कोणती आर्थिक मदत देण्यात आली आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) मृतक श्री.यशोधन भोस्कर हे स्वत: ठेकेदार असल्यामुळे त्यांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

परंतु, अपघात झाल्यापासून कर्मचारी राज्य विमा योजने अंतर्गत जखमी कामगार- श्री.अतुल बोरकर यांना दि.३१.०३.२०१९ ते दि.१५.०५.२०१९ पर्यंत व श्री.उपेंद्र बेन यांना दि.३१.०३.२०१९ ते दि.०१.०५.२०१९ पर्यंत भरपगारी रजा देण्यात आल्या व त्यांना सानुग्रह राशी म्हणून अनुक्रमे रु.१४,०००/- व रु.६,०००/- देण्यात आले.

(५) कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात घडलेल्या सदर आपात्कालीन घटनेसंदर्भात नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या शिफारसी लागू करण्याकरीता तसेच औष्णिक विद्युत केंद्रात अशी आपत्कालीन घटना घडू नये व त्याकरीता योग्य कार्यपध्दती अवलंबण्यासाठी महानिर्मिती कंपनीकडून परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील औद्योगिक वसाहतीत भुखंड वाटपामध्ये झालेला गैरव्यवहार

**(१५) * १३६७४३ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीतील लहान भूखंड वाटप करतांना भूवाटप समितीने मागील दोन वर्षापुर्वी ऑनलाईन अर्ज करुन देखील अर्जदारांना भूखंड वाटप न करता त्यानंतर अर्ज केलेल्या अर्जदारांना भूखंड वाटप केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ९ उद्योगांनी एकाच दिवशी म्हणजे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ तर २ उद्योगांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१८ रोजी अर्ज सादर केलेले असतांना या उद्योजकांना भूखंड वाटप करुन मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूखंड वाटपासाठी गठीत असलेल्या भू-वाटप समितीच्या बैठकीमध्ये एका त्रयस्त व्यक्तीची उपस्थिती असल्याने एकुणच भूखंड वितरणात मोठा गैरव्यवहार झाल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजी लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री व मा.उद्योग मंत्री यांच्याकडे चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त गैरव्यवहाराप्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२) अंबड औद्योगिक क्षेत्रात सन २०१५ ते २०१८ या कालावधीत भूखंड वाटपाबाबत एकूण ३२ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २७ अर्ज ऑफलाईन व ५ अर्ज ऑनलाईन होते. त्यांची महामंडळाने प्रचलित नियम व धोरणानुसार तपासणी केली असता, ते अपात्र ठरल्याने महामंडळाने निकाली काढले आहेत व तसे संबंधितांना दि.१०/११/२०१८ व २०/११/२०१८ रोजी कळविले आहे.

तद्नंतर पूर्वी प्राप्त झालेल्या ३२ अर्जापैकी १३ अर्जदारांनी पुन्हा नव्याने भूखंड वाटपाबाबत ऑनलाईन अर्ज केले आहे. १० अर्जदारांनी त्यांच्या मूळ भूखंडावरील सामासिक अंतरातील बांधकाम काढण्याच्या अटीच्या अधिन राहून भूखंड वाटपाची विनंती केली आहे. तर, ३ अर्जदारांनी उपलब्ध असलेल्या भूखंडातून भूखंड वाटपाची मागणी केली आहे. त्यानुसार महामंडळाने दि. २७/०४/२०१२ व ०७/०१/२०१३ च्या परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आलेल्या धोरणास अनुसरुन महामंडळाने १३ अर्जदारांना उद्योगाच्या विस्तारासाठी भूखंड वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे.

(३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२२/०२/२०१९ रोजी निवेदन सादर केले होते. त्याअनुषंगाने दि.२२/०४/२०१९ च्या पत्रान्वये महामंडळाकडून प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरबेट व कोते (जि.कोल्हापूर) येथील आश्रमशाळा बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(१६) * १३५४४१ श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील बोरबेट (ता.गगनबावडा) आणि कोते (ता.राधानगरी) येथील सन १९७२ मध्ये सुरु केलेल्या आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला असून सदरहू निर्णयाला स्थगिती मिळावी अशी मागणी बोरबेट व कोते ग्रामपंचायतीने दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आश्रम शाळा बंद करण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू आश्रमशाळा बंद न करण्याचा दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कोल्हापूर जिल्हयात आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील भागात आदिवासी जमातीची लोकसंख्या खूपच कमी आहे. कोल्हापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या बोरबेट या आश्रमशाळेत एकही आदिवासी विद्यार्थी नाही. तर कोते आश्रमशाळेत १७ आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आदिवासी विद्यार्थी

संख्या कमी असल्याने सदर शाळा सामाजीक न्याय विभाग / विमुक्त जाती भटक्या जमाती यांच्याकडे हस्तांतरण करुन घेण्याबाबत त्या विभागास कळविले होते. या विभागापैकी एकाही विभागाने आश्रमशाळा सुरु ठेवण्याबाबत कार्यवाही न केल्याने ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींची मागणी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सदर आश्रमशाळा बंद करण्याच्या निर्णयास एक वर्षाची स्थगिती दिली आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यात आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहन अनुदानाअंतर्गत निधी मिळण्याबाबत

**(१७) * १३९०८६ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात आंतरजातीय विवाह करणाऱ्या २१६ जोडप्यांच्या प्रोत्साहन अनुदानाच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली असुन अद्यापपर्यंत निधी मिळालेला नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या वतीने ही योजना राबविण्यात आली असुन सध्या ५० हजार रूपये अनुदान दिले जाते परंतु यावर्षी या प्रस्तावाला मंजुरी मिळाली असुन अद्यापपर्यंत निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना नवीन नियमानुसार २ लाख ५० हजार रूपये प्रोत्साहन अनुदान म्हणुन देण्यात येणार असून त्याबाबत अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन अनुदानाच्या प्रस्तावाला मंजुरी मिळून निधी वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश खाडे :** (१) होय.

(२) अशंतः खरे आहे, सदर योजना केंद्र व राज्य हिस्सा ५०:५० या प्रमाणात राबविण्यात येते. सन १८-१९ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून अपुरा निधी प्राप्त झाल्याने त्या प्रमाणात राज्य शासनाकडून निधी देण्यात आलेला आहे.

(३) सदरचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडे निधीची मागणी करण्यात आलेली असून सदरचा निधी प्राप्त झाल्यावर राज्य शासनाच्या हिश्श्याचा निधी वितरीत करुन आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शितल कृषी निविष्ठ सहकारी संस्थेतील (जि.नांदेड) तूर व हरभऱ्याच्या खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१८) * १३९३०० श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील पणन महासंघामार्फत दिनांक १ मार्च, २०१८ ते १३ जून, २०१८ मध्ये हरभरा व तूर खरेदी करण्यात आली असून, खरेदीची व्यापकता लक्षात घेता बाजार समित्यांना सब एजंट नेमण्याची परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नांदेड जिल्ह्यातील सब एजंट शितल कृषी निविष्ठ सहकारी संस्थेच्या केंद्रावर विहित मुदतीत १ लाख २२ हजार १४५ क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आला आहे. तथापि, खरेदीपैकी ५ हजार २२१ क्विंटल तूर व हरभरा वखार महामंडळाच्या गोदामात जमा करण्यात आलेला नसून सुमारे २ कोटी २९ लाख ७३ हजार ९८४ इतक्या रकमेचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी पणन महासंघाचे विभागीय अधिकारी यांनी अंबाजोगाई पोलिसांत गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी संबधित दोषी आढळून आलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) नाही.

(२), (३) व (४) हंगाम २०१७-१८ मध्ये शितल कृषी निविष्ठ सहकारी संस्था, अंबेजोगाई, जि. बीड या संस्थेने पणन महासंघाच्या वतीने तूर व हरभरा(चना) खरेदीचे काम केलेले आहे. सदर संस्था खरेदी केंद्रावर शिल्लक असलेला माल गोदामात साठवणूक करीत नसल्याने संबंधित संस्थेविरुद्ध दिनांक १३/४/२०१९ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. यासंदर्भात पोलिस चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत ताडी बनविण्यासाठी क्लोरल हायड्रेट या विषारी रसायनाचा वापर होत असल्याबाबत

**(१९) * १३६५२९ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत ताडी बनविण्यास क्लोरल हायड्रेट या विषारी रसायनाचा वापर केला जात असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या क्लोरल हायड्रेटमुळे मळमळणे, उलटी होणे, चक्कर येऊन तोल जाणे किंवा अनेकदा बेशुद्ध होणे असे प्रकार घडतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात असलेल्या २५० दुकानांत या विषारी रसायनाचा वापर केलेल्या ताडीचा पुरवठा केला जात असल्याचे निदर्शनास आले असून सदर पुरवठा करणाऱ्या दोषी व्यक्तींना पोलिसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) असे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी आरे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.७८/२०१९, भा.दं.वि.सं. कलम ३२८, २७२, २७३, ३४ सह महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ कलम ६५ (ई), ७८ आणि विषारी पदार्थ अधिनियम, १९१९ कलम ६ (१) (अ) अन्वये गुन्हा दाखल असुन त्यामध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदर ठिकाणी क्लोरल हायड्रेट या विषारी रासायनिक पदार्थाच्या एकूण ७८ गोण्या (वजन अंदाजे २१८४ कि.ग्रॅ.), प्रत्येकी २०००/- रुपये प्रमाणे एकूण रु. ४३,६८,०००/- तसेच रु.४५,३४,३००/- इतकी किंमत असलेले साहित्य/माल जप्त करण्यात आलेले आहे. नमुद गुन्हा तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नागरी सहकारी बँकांचा व पतसंस्थांचा कृषी कर्जमाफी योजनेत समावेश करण्याबाबत

**(२०) * १३६७६६ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला),**

**श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी संकटामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या व कर्जबाजारीपणामुळे आलेले नैराश्य, यासाठी शासनाने दोन वर्षापूर्वी राज्यात कृषी कर्जमाफी योजना राबविण्याचा निर्णय घेतला, त्यानुषंगाने ऑनलाईन कर्जमाफी योजनेंतर्गत माहे नोव्हेंबर, २०१८ अखेर राज्यातील ५० लाख शेतकऱ्यांना २१ हजार कोटी रुपयांची कृषी कर्जमाफी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी कर्जमाफी योजना लागू करतांना शासनाने बँकांबाबत ग्रामीण आणि नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पथसंस्था असा दुजाभाव केल्याने राज्यातील ८० ते १०० नागरी सहकारी बँकांचे १२५ ते १५० कोटींपर्यंत कृषीकर्ज थकले असून यामुळे नागरी बँका, पतसंस्था अडचणीत आल्याची बाब माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील नागरी सहकारी पतसंस्था या केवळ नागरी सहकारी वर्गात असल्याने कृषी कर्जमाफी योजनेत त्यांचा समावेश झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणेच नागरी सहकारी बँकांनी, पतसंस्थांनी अल्पमुदतीचे कृषी कर्ज वितरीत केले आहे त्यामुळे कृषी कर्जमाफी योजनेत नागरी सहकारी बँकांचा, पतसंस्थांचा समावेश करणे आवश्यक असताना उक्त बँकांचा समावेश न केल्याने हजारो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले असून बँकांचे कर्जही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कृषी कर्जमाफीसाठी नागरी सहकारी बँकांचाही समावेश करावा अशी मागणी सहकार भारती या संस्थेने शासनाकडे केली असून त्याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख** : (१) वेगवेगळया नैसर्गिक आपत्ती जसे अपुरा पाऊस (दुष्काळ) तसेच काही भागातील अवेळी पाऊस व गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर झालेले नुकसान यामुळे बरेच शेतकरी पीककर्जाची / शेती कर्जाची मुदतीत परतफेड करु शकले नाहीत. परिणामी हे शेतकरी थकबाकीदार राहिल्यामुळे अशा शेतक-यांना नव्याने पीककर्ज घेण्यास निर्माण झालेल्या अडचणी विचारात घेऊन अशा शेतक-यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ योजना लागू केली आहे.

सदर योजने अंतर्गत ५०.२७ लाख खातेदारांना रु. २४,१०२ कोटी मंजूर करण्यात आलेले असून दि. ३१.५.२०१९ अखेर पर्यत ४३.७६ लाख लाभार्थ्यांना रु १८,४५७.४० कोटीचा लाभ देण्यात आलेला आहे.

(२) सदरची योजना नागरी सहकारी बँका व पतसंस्था लागु न केल्याने सदरच्या बँका/पतसंस्था अडचणीत आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना खरीप व रब्बी हंगामात राज्यस्तरीय बँकर्स समितीकडून पीककर्जाचे उदिष्ट दिले जात नाही. तसेच केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून शेतक-यांना अल्प दराने पीककर्ज वाटप करणेस नागरी बँका/पतसंस्था यांना कोणताही व्याज परतावा/व्याज सवलत दिली जात नाही. यास्तव सदर नागरी बँका व पतसंस्था यांचेकडून शेतक-यांना ७% दराने पीककर्ज पुरवठा करीत नाहीत. त्यामुळे नागरी सहकारी बँका व पतसंस्थांचा समावेश छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ या कृषी कर्जमाफी योजनेत करण्यात आलेला नाही.

सदर बँका/संस्था यांचा समावेश न केल्याने हजारो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले असून बँकांचे कर्ज थकले आहेत अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासींची गावे वाडया व वस्त्या प्राथमिक सोयी-सुविधा पासुन वंचित असल्याबाबत

**(२१) * १३७९९५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी ठाकूर या मागास जमातींची गावे, वाडया व वस्त्या असुन पिढयानपिढया कायमस्वरूपी डोंगरावर दूर्गम भागात वास्तव्य करीत असून तेथे अजूनही रस्ते, शाळा, वीज, पाणी व रुग्णालय इ. प्राथमिक सोयी-सुविधां पासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही सर्व गावे व वाड्या-वस्त्या हया मुख्य रस्त्यापासून किंवा शाळेपासून ४ ते ५ कि.मी.अंतरावर असून रस्ता नसल्यामुळे त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची वाहने येत नाहीत त्यामुळे ग्रामस्थांना, रूग्णांना तसेच मुलांना शाळेत जाण्यासाठी पायी प्रवास करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर गाव व वाड्या-वस्त्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन पायाभूत सुविधांची कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) व (२) हे खरे नाही.

अलिबाग तालुका हा शासनाने जाहिर केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आहे. मात्र सदर तालुक्यातील अनुसूचित जमातींच्या लाभ धारकांना वैयक्तिक तसेच सामुहिक विकासाच्या योजनांचा लाभ देण्यात येत आहे. तसेच ठक्करबाप्पा वस्तीसुधार योजनेअंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे, संरक्षक भिंती बांधणे, समाजमंदिर बांधकाम, विहिर बांधकाम व दुरुस्ती, नळपाणी पुरवठा, पायवाट रुंदीकरण व रस्ता बांधकाम यांसारख्या कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

(३) ठक्करबाप्पा वस्तीसुधार योजनेअंतर्गत विकास कामांसाठी सन २०११-१२ ते २०१८-१९ पर्यंत रु.३३१.१२ /- लक्ष इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील वीज वितरण व वीज देयक वसूली करणाऱ्या टोरंट पॉवर कंपनीने शासनाचे मुद्रांक शुल्क थकविल्याबाबत

**(२२) * १३८९७१ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील वीज वितरण व वीज देयक वसूली करण्याकरीता वीज वितरण विभागाने खाजगी टोरंट पॉवर कंपनीची केलेली नेमणूक कराराप्रमाणे १० वर्षाचा कालावधी संपल्यानंतर पुन्हा १० वर्षासाठी मुदतवाढीचा नवीन करार अवघ्या शंभर रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर केल्यामुळे शासनाचा कोटयवधी रुपयांचा मुद्रांक शुल्क थकविल्याची बाब दिनांक ४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपनीने १ कोटी ८५ लाख रुपयाचे मुद्रांक शुल्क शासनाकडे भरणा करणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश मुख्य सचिवांनी दिले होते, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मे. टोरंट पॉवर कंपनीचा महावितरण सोबत झालेला मुदतवाढीचा करार रु. ५०० च्या स्टॅम्प पेपरवर करण्यात आला आहे.

(२) व (३) या प्रकरणी मुद्रांक शुल्क अधिकारी (ठाणे ग्रामीण) यांचेकडून दि.०७.१०.२०१७ रोजी रु.१,८७,४६,८३०/- रकमेचा भरणा करणेबाबत मे.टोरंट पॉवर कंपनीस मागणीपत्र दिले होते. सदर मागणी अयोग्य असल्याचे मे.

टोरंट पॉवर कंपनीने मुद्रांक शुल्क अधिकारी (ठाणे ग्रामीण) यांना कळविले. याबाबत मुद्रांक शुल्क अधिकारी (ठाणे ग्रामीण) यांचेकडे दिनांक ७.५.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीअंती रु.१,०१,०४,७००/- रक्कमेचे मुद्रांक शुल्क भरण्याबाबत मे. टोरंट पॉवर कंपनीला आदेश देण्यात आले. सदर आदेशाविरुध्द मे. टोरंट पॉवर कंपनीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली असून त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार रु. २५,१५,०००/- ची रक्कम मुद्रांक शुल्क अधिकारी, (ठाणे ग्रामीण) यांचे कार्यालयात मे.टोरंट पॉवर कंपनीने जमा केली आहे. सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल-खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील औद्योगिक वसाहतीतील स्थानिकांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

**(२३) * १३४९४० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल-खालापूर (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांमध्ये स्थानिकांना नोकरीमध्ये सामावून घेतले जात नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाचा दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ रोजीचा शासन आदेश क्रमांक ईएलपी-२००८/सी.नं.९३/इंड-६ स्थानिकांना रोजगारामध्ये कमीत कमी ८० टक्के पर्यंत प्राधान्य देण्यासंबंधी तरतूद असताना सुध्दा स्थानिकांना नोकरीत सामावून न घेतल्यामुळे बेरोजगारांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी कंपनी प्रशासनाकडे तसेच कामगार विभागाकडे वारंवार मागणी व आंदोलने करून सुध्दा स्थानिकांना नोकरीत सामावून घेतले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कंपनी प्रशासनाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच स्थानिकांना नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२), (३) व (४) सर्व सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठया व विशाल औदयोगिक उपक्रमांमध्ये किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याबाबत शासनाच्या दि.१७ नोव्हेंबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये सुधारित कार्यपद्धती विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील सर्व औद्यागिक आस्थापनांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय श्रेणीसहित इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देणे बंधनकारक केले आहे.

उदयोग संचालनालय यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार रायगड - खालापूर येथील १९३ मोठया व विशाल उपक्रमांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत ७८ टक्के व पर्यवेक्षकीयसहित इतर श्रेणीत ८५ टक्के तसेच पनवेल येथील सुक्ष्म, लघु उपक्रमांमध्ये ७६.८८ टक्के व पर्यवेक्षकीयसहित इतर श्रेणीत ८९.०२ टक्के खालापूर येथील पर्यवेक्षकीय श्रेणीत ७५.१९ टक्के व पर्यवेक्षकीयसहित इतर श्रेणीत ८२.१५ टक्के इतक्या स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यामुळे पनवेल-खालापूर (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांमध्ये स्थानिकांना नोकरीमध्ये सामावून घेतले जात नाही असे निदर्शनास आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याबाबत

**(२४) * १३९२८३ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्ज मिळावे म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्षाने स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, पाथरी यांचेकडे दिनांक २७ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले असून दिनांक २२ ऑक्टोबर, २०१८ रोजी त्या सुमारास भारतीय स्टेट बँकेच्या परभणी विभागीय कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांना कर्ज न मिळाल्यामुळे दिनांक १२ डिसेंबर, २०१८ पासून भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने परभणी जिल्ह्यातील पाथरी येथील भारतीय स्टेट बँकेच्या कृषी शाखेसमोर बेमुदत उपोषण आंदोलन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक १३ डिसेंबर, २०१८ रोजी उपोषणादरम्यान एका आंदोलक शेतकऱ्याचा पाथरी येथील भारतीय स्टेट बँकेच्या कृषी शाखेसमोर हृदय विकाराने मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मृत्युमुखी पडलेल्या उपोषणकर्त्या शेतकऱ्याच्या वारसांना शासनामार्फत मदत करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख** : (१) होय.

(२) होय.

(३) नाही, संबंधित आंदोलक श्री. तुकाराम वैजनाथ काळे, रा.मरडसगाव, ता.पाथरी, जि.परभणी यांना आंदोलनाचे ठिकाणी अस्वस्थ वाटु लागल्याने मानवत ग्रामीण रुग्णालय, पाथरी येथे दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाला.

(४) व (५) सदर मयत शेतकऱ्याचे भाऊ श्री. गणेश वैजनाथ काळे यांच्या तक्रारीवरुन पाथरी पोलीस ठाणे येथे फौजदारी प्रक्रीया संहिता मधील कलम १७४ अन्वये आकस्मीक मृत्यू म्हणून ई.डी. क्रमांक (५२) नुसार नोंद करण्यात आलेली आहे. तसेच मयत शेतकरी यांचे वारसांना मा.मुख्यमंत्री

सहायता निधीमधून रु.१० लक्ष मदत देणेसाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्या कडून शासन स्तरावर सादर करण्यात आलेला होता. सदर प्रकरणी मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी सार्वजनिक न्यासाच्या ध्येय व उद्दीष्टानुसार अर्थसहाय्य अनुज्ञेय ठरत नाही.

स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पाथरी, जिल्हा परभणी येथे दि.१३/१२/२०१८ पर्यंत पीक कर्ज मागणीसाठी २,३९५ अर्ज प्राप्त झालेले होते. त्यापैकी दि.१३/१२/२०१८ पर्यंत १,५९५ खातेदारांच्या कर्ज खात्यावर पीक कर्जाच्या रकमेचे वाटप केलेले आहे. तसेच संबंधित बँक शाखेने दि. ३१ मार्च, २०१९ अखेर २,३५० पात्र खातेदारांना रु. १४,०१,०९,१००/- पीक कर्ज वाटप केले असल्याचे कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील यापिशिका इंजिनिअरींग प्रा.लि. आणि मे.जब्बल ऑटो प्रा.लि. या दोन कंपन्यांना बेकायदेशीररित्या कर्ज मंजूर केल्याबाबत

**(२५) * १४०६२६ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील यापिशिका इंजिनिअरींग प्रा.लि. आणि मे.जब्बल ऑटो प्रा.लि. या दोन कंपन्यांना अनुक्रमे २ कोटी आणि ३ कोटी ७५ लाख रुपये कर्ज भोसले सहकारी बँकेने बेकायदा मंजूर केल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्जाचे सहकार खात्याकडून सूक्ष्म लेखा परिक्षण करण्यात आल्यानंतर कर्ज मंजूरीत अनियमितता आढळून आली तसेच माल खरेदीचे कोटेशन बँक दप्तरी घेण्यात आले नसुन या व्यवहारावर नियंत्रणही नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित गैरव्यवहारात व अनियमिततेत दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय .
(३) व (४) यापिशिका इंजिनिअरींग प्रा.लि. आणि मे. जब्बाल ऑटो प्रा.लि. या दोन कंपन्यांना शिवाजीराव भोसले सहकारी बँक मर्या., पुणे या बँकेने मंजूर केलेल्या कर्जांच्या अनुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने सहकार आयुक्तांच्या दिनांक २९.९.२०१७ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१ (३) (क) मधील तरतूदीनुसार बँकेचे चाचणी लेखापरिक्षण करण्यात आले. सदर चाचणी लेखापरिक्षण अहवालानुसार वरील दोन्ही कंपन्यांच्या कर्ज मंजूरीमध्ये अनियमितता आढळून आल्याने कर्जदार व बँकेच्या संबंधीत कर्मचाऱ्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलिस स्टेशन, पुणे येथे दिनांक १५.३.२०१९ रोजी एफ आय आर क्र. ०१९२/२०१९ दाखल करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रिलायन्स कंपनीने संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(२६) * १३५४०८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागोठणे ते दहेज या गॅस पाईपलाईनसाठी रिलायन्स कंपनीने पालघर जिल्ह्यातील ३ हजार शेतकऱ्यांची जमीन संपादित केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला रिलायन्स कंपनीने न दिल्यामुळे डहाणू मधील तवा या गावातील संतप्त शेतकऱ्यांनी रिलायन्सची गॅस पाईपलाईनच काढून टाकली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जमीन संपादित केलेल्या ३ हजार शेतकऱ्यांना योग्य मोबदला रिलायन्स कंपनीकडून अद्याप अदा न केल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संपादित केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम, १९६२ चे कलम १० मधील तरतूदीनुसार तसेच संपादन संस्थेने गाव-निहाय निर्धारित केलेल्या दराप्रमाणे संबंधित शेतकऱ्यांना जमिनीची / पिकांची व इतर नुकसान भरपाई अदा केली आहे.

सदर नुकसान भरपाईच्या तफावतीबाबत आदिवासी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने शासनाने गठित केलेल्या समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या मोबदल्यामध्ये तफावत असल्याने आदिवासी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने शासनाने मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, जिल्हाधिकारी, पालघर व सहसंचालक नगररचना, कोकण विभाग यांची समिती गठित केली होती. समितीने केलेल्या शिफारसी नुसार शासनाने बाधित शेतकऱ्यांना रक्कम रु. ५९,८४०/- प्रती गुंठा दर देणेबाबत निर्देश दिलेले आहेत. पालघर जिल्ह्यातील पालघर, तलासरी, डहाणू व विक्रमगड तालुक्यातील बाधित झालेल्या ११०७ कुटुंबाना रिलायन्स फाउंडेशन कंपनीमार्फत ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानअंतर्गत आर्थिक सहाय्य देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शासकीय वसतीगृहांत बसविण्यात आलेले सोलर वॉटर हिटर नादुरुस्त असल्याबाबत

**(२७) * १३५७९८ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय वसतीगृहांतील विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गरम पाणी मिळावे याकरीता सन २०११-१२ मध्ये ७३३ सोलर वॉटर हिटर बसविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलर वॉटर हिटरच्या तसेच बायोमॅट्रिक यंत्रणा बसविणाऱ्या पुरवठादाराकडून अटी-शर्ती प्रमाणे कार्यवाही करण्यात येत नसल्यामुळे ७३३ सोलर वॉटर हिटर बंद व नादुरुस्त झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलर वॉटर हिटर ज्या पुरवठादाराने पुरविले आहेत ती कंपनी बंगलोरची असून, सदर सोलर वॉटर हिटर पुरविणाऱ्या या कंपनीला देयकेही अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालात काय आढळून आले व त्यानुषंगाने अटी व शर्तीचे उल्लंघन करणाऱ्या पुरवठादारांना देयके अदा करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश खाडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

शासकीय वसतिगृहांना पुरवठा करण्यात आलेल्या सोलर वॉटर हिटर संयंत्रांपैकी १५४ संयत्रे नादुरुस्त असल्याचे निर्दशनास आले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

मे. रश्मी इंडस्ट्रिज बेंगलोर यांनी एकूण ७३३ सोलर वॉटर हिटर सयंत्रांचा पुरवठा केलेला असून पुरवठादारास पुरवठा केलेल्या ७१० नगाची

९०% रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तर उर्वरित २३ नगांची १००% तसेच ७३३ यत्राची १०% रक्कम शासन खाती जमा करण्यात आलेली आहे.
(४) कंपनीने पुरवठा केलेल्या यंत्राची ९०% रक्कम अदा केलेली असून, उर्वरीत रक्कम शासनाकरवी जमा करण्यात आली आहे. कराराचा भंग केल्याबाबत सदर कंपनीस नोटीस बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार (ता.पालघर) येथील आदिवासींच्या विकास योजनेत झालेला गैरव्यवहार

**(२८) * १३५७४७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी शासन विविध योजना राबवित असताना जव्हार येथील (ता.पालघर) आदिवासी योजनांमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गैरव्यवहाराप्रकरणी निवृत्त प्रकल्प अधिकारी यांच्यासह विविध संस्थांच्या संचालकांवर गुन्हे दाखल केले असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहाराप्रकरणी शासनाने सखोल चौकशी करण्याकरिता समिती नेमली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने गैरव्यवहाराप्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच आदिवासींना पुरविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये पारदर्शकता राहण्यासाठी व त्यांना योजनांचा पुरेपूर लाभ घेता यावा यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय.

न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये नमूद करण्यात आलेल्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यासह, अहवालात नमूद संस्थांच्या संचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) न्या.गायकवाड समितीने सखोल चौकशी करून आपला चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे. चौकशी अहवालामध्ये नमूद दोषी अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्याबरोबरच शिस्तभंगविषयक कार्यवाहीस सुरूवात करण्यात आली आहे.

(४) आदिवासींना पुरविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये पारदर्शकता राहण्याकरीता व सदर योजनांचा आदिवासींना पुरेपूर लाभ मिळावा या उद्देशाने व्यक्तिगत योजनांमध्ये थेट लाभ योजना (डी.बी.टी) राबविण्यास सुरूवात करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम मिळण्याबाबत

**(२९) * १३७७६५ श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत**

**ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या ऊसाच्या एफआरपीचे सुमारे ४ हजार ४८५ कोटी रुपये थकविले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊस घेऊन गेल्यानंतर संबंधित कारखान्याने शेतकऱ्यांना १५ दिवसांत वाजवी आणि किफायतशीर दर (एफआरपी) देणे बंधनकारक असून गाळप हंगाम अंतिम टप्प्यात आलेला असतानाही अनेक शेतकऱ्यांना एफआरपीनुसार दर मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साखर कारखान्यांनी ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांची एफआरपी थकविली किंवा वेळेत दिलेली नाही त्यांना एफआरपीवरील व्याजाची रक्कम मिळण्यासाठी आरआरसी प्रक्रिया तात्काळ सुरु करावी तसेच आरआरसी कारवाई टाळणाऱ्या तहसिलदारांना दोषी ठरवावे आणि त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी दिनांक ६ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यात साखरेच्या किमान किंमतीत सरकारने वाढ केल्यामुळे शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम वजा करुन उपलब्धतेनुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम देण्याचा निर्णय कोल्हापूर येथे साखर कारखानदाराच्या बैठकीत घेण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने एफआरपीची रक्कम शेतकऱ्यांना त्वरीत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या ऊसाच्या देय एफआरपीचे दि.३०/०४/२०१९ अखेर रू. ३६०७.५३ कोटी इतकी रक्कम थकित होती.

(२) अंशत: खरे आहे

हंगाम २०१८-१९ अखेर १९५ कारखान्यांनी ९५२.११ लाख मे.टन ऊसाचे गाळप केले आहे. सदर ऊसाचे देय FRP प्रमाणे रू.२३०३३.०७ कोटी ऊस किंमत होती. त्यापैकी कारखान्यांनी ऊस पुरवठादारांना रू.२१६०४.९४ कोटी रक्कम (९३.८० %) अदा केली असून दि.३१/०५/२०१९ अखेर १०२ कारखान्यांकडे रू.१४२८.१३ कोटी थकित आहे.

(३) होय.

RRC आदेशाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तसेच तहसिलदार यांचे कार्यालयाकडून कारवाई सुरू आहे.

(४) नाही.

(५) थकबाकी असणाऱ्या कारखान्यांना शेतकऱ्यांच्या FRP रक्कमा अदा करणेस वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे, संबंधितांच्या सुनावण्या घेण्यात आलेल्या आहेत, पुरेशी संधी देवून थकीत असणाऱ्या कारखान्यांविरुध्द ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ अन्वये दि.३१/०५/२०१९ पर्यंत ७३ RRC आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे निर्गमित केलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव व अनुदान देण्याबाबत

**(३०) * १३५८५० श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती**

**ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना माहे डिसेंबर, २०१८ व माहे जानेवारी, २०१९ या दोन महिन्यात मागील वर्षाच्या तुलनेत कमी भाव मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांद्याला कमी भाव मिळत असुन उत्पादन खर्चही निघत नसल्यामुळे शेतकरी कृती समितीने टेहरे (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करुन कांद्याला हमीभाव देण्याची मागणी केलेली असून, आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ असलेल्या लासलगांव (जि.नाशिक) येथील कांदा लिलाव मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत बंद ठेवण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, लातूर जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये शेतकरी कांद्याचे उत्पादन घेतात, परंतु सीमावर्ती भागातून येणाऱ्या कांद्यामुळे बाजारपेठेत कांद्याची आवक वाढल्यामुळे कांद्याला हवा तसा भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात कांद्याचे दर घसरुन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना थेट अनुदान देण्याची मागणी लोकप्रतिनिधी व शेतकरी संघटना यांनी मा.मुख्यमंत्री, मा.पणन मंत्री यांचेकडे दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने कांद्याला योग्य भाव मिळण्यासाठी व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना थेट अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अशंत: खरे आहे.

(२) कांद्याला कमी भाव मिळत असल्याने, शेतकरी कृती समिती टेहरे (ता.मालेगांव, जि.लातूर) यांनी नाशिक-आग्रा महामार्गावर दिनांक २२/०९/२०१८ रोजी रास्तारोको आंदोलन केले होते. कांदा हा नाशवंत असल्याने कांद्याला हमी भाव जाहिर केला जात नाही.

लासलगांव (जि.नाशिक) येथील कांदा लिलाव वर्षाअखेरीस हिशोब पूर्ण करण्यासाठी व्यापाऱ्यांच्या मागणीनुसार बंद ठेवण्यात आले होते.

(३) नाही.

लातूर जिल्ह्यातील २ कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याची आवक होते. मात्र सीमावर्ती भागातून कांदा विक्रीस येत नाही.

(४) व (५) होय.

हंगाम २०१८-२०१९ मध्ये राज्यात माहे ऑक्टोबर,२०१८ नंतर बाजारातील कांद्याच्या दरात झालेल्या घसरण झाल्याने दिनांक १ नोव्हेंबर,२०१८ ते दिनांक १५ डिसेंबर,२०१८ या कालावधीत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती व खाजगी बाजार समित्यामध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये २००/-प्रति क्विंटल अनुदान व २०० क्विंटल प्रति शेतकरी या प्रमाणात अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कांदा अनुदानाच्या कालावधीत वेळोवेळी वाढ करण्यात आली असून, सुधारित कालावधी दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ असा निश्चित करण्यात आला आहे. दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक १५ डिसेंबर, २०१८ या कालावधीतील विक्री केलेल्या १,६०,६९८ पात्र लाभार्थी शेतकऱ्यासाठी रुपये ११४.८० कोटी निधी आकस्मिकता निधीद्वारे उपलब्ध करुन दिला असून, सदर कांदा अनुदान शेतकऱ्यांना वितरित करण्याची कार्यवाही पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरुन सुरु आहे.

आतापर्यंत एकूण १,५६,३२५ लाभार्थी शेतकऱ्यांना रुपये १११.७० कोटी इतके कांदा अनुदान वितरित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) येथील आश्रमशाळांमध्ये पोषण आहाराचा धान्य पुरवठा होत नसल्याबाबत

**(३१) * १४०१९८ श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत ३० शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे १५ हजार ५०० आदिवासी विद्यार्थी निवासी राहुन शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा तालुक्यातील (जि.पालघर) येथील आश्रमशाळांमध्ये दिनांक १२ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पोषण आहारासाठी लागणारा धान्य पुरवठा करणाऱ्या पारसेवार अँड कंपनी, नांदेड या ठेकेदाराचा ठेका शासनाने रद्द करून काळ्यायादीत टाकल्याने धान्य पुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आश्रमशाळेला ठेकेदाराकडून धान्य पुरवठा होत नसल्यामुळे आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी यांनी मुख्याध्यापकांना त्यांच्या स्तरावर धान्य खरेदी करण्यास सांगितल्याने आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पुरेसा पोषण आहार मिळत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वेळेवर पोषण आहार मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सन २०१८-१९ साठी ई-निविदेद्वारे निश्चित केलेले न्युनतम दराचे पुरवठाधार मे. पारसेवार ॲण्ड कंपनी यांनी पुरवठा करण्यास असहमती दर्शविली होती. त्यामुळे मे. पारसेवार ॲण्ड कंपनी या ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्यात आले. संबंधीत शासकीय आश्रमशाळेत गरजेइतके अन्नधान्य - कडधान्य, किराणामाल व मसाले हे स्थानिक पातळीवर बाजारभावापेक्षा जादा दर येणार नाहीत या अटीवर खरेदी करण्याचे तात्पुरते अधिकार मुख्याध्यापक यांना प्रदान करण्यात आले होते. त्याप्रमाणे मुख्याध्यापकांनी स्थानिक पातळीवर अन्नधान्य, कडधान्य व किराणामाल खरेदी करुन मानकाप्रमाणे विद्यार्थ्यांना भोजनपुरवठा केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धनकवडी (ता.हवेली, जि.पुणे) येथील महावितरणचे विद्युत खांब धोकादायक अवस्थेत असल्याबाबत

**(३२) * १३६९७२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनकवडी (ता.हवेली, जि.पुणे) येथील सावरकर चौक ते जनुबाई मंदिरापर्यंतच्या मुख्य रस्त्यामध्ये महावितरणचे विद्युत खांब धोकादायक अवस्थेत असल्यासंदर्भात सबंधित विभागाच्या कार्यालयाकडे वारंवार पत्रव्यवहार करुन व बैठका घेऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे मे, २०१९ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या विद्युत खांबांमुळे यापूर्वी छोटे मोठे अपघात झाले असून पुनश्च दुर्घटना सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असतांना देखील संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच भविष्यात कोणत्याही प्रकारची मोठी दुर्घटना होऊ नये यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. मा.लोकप्रतिनिधी यांच्यासोबत झालेल्या चर्चेनुसार सदर ठिकाणच्या विद्युत संच मांडणीची संयुक्त पाहणी, विद्युत निरीक्षक, पुणे व महावितरण कंपनीचे अधिकारी यांचेकडून करण्यात आली. त्याप्रमाणे सदर ठिकाणच्या उपरी वीज वाहिनीचे भूमिगत करण्याचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, पद्मावती विभाग या कार्यालयाकडून दिनांक १५.०३.२०१९ रोजी मंजूर करण्यात आले आहे.
(२) व (३) हे खरे नाही. सदर विद्युत खांबामुळे अपघात झालेला नाही. सुरक्षिततेच्या दृष्टीने तेथील उपरी वीज वाहिनी भूमिगत करण्याबाबतचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे.
(४) भविष्यात कोणत्याही प्रकारची मोठी दुर्घटना होऊ नये यासाठी वेळोवेळी देखभाल दुरुस्तीची कामे महावितरण कंपनीमार्फत करण्यात येतात. तसेच उपरोक्त काम पुणे महानगरपालिकेची रस्ता खोदाईस परवानगी मिळताच करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धामणगांव (जि.अमरावती) तालुक्यातील दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(३३) * १३७६३३ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामणगांव तालुक्यातील (जि.अमरावती) परिमंडळ महावितरण कार्यालयाच्या स्थानिक उपविभागातर्फे अनेक गावांमध्ये दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेंतर्गत २५ कोटी रुपये खर्चून कामे केली जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांकडे महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत अनेक तक्रारी स्थानिक प्रशासनाकडे प्राप्त झाल्याचे माहे एप्रिल २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कामांकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण अधिक्षक अभियंता, अमरावती मंडळ यांच्या कार्यक्षेत्रातील धामणगाव तालुका जिल्हा अमरावती मध्ये दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत एकूण रु.८.३३ कोटी रक्कमेची कामे सुरु आहेत.

(२) हे खरे नाही. या योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या विद्युत वाहिनींची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबतची बातमी दिनांक २३ एप्रिल, २०१९ स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झालेली होती. या व्यतिरिक्त महावितरणच्या स्थानिक कार्यालयास कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित बातमीची दखल घेऊन महावितरण कंपनीमार्फत सदर तक्रारीची चौकशी करण्यात आली असून, चौकशीअंती असे निदर्शनास आले की, वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या वाहिनीचे छायाचित्रे हे दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या वाहिनीचे नसून जुन्या वाहिनीचे आहेत. तसेच तक्रारीमध्ये उल्लेखित सोनगाव खर्डा ते निंभोरा बोडखा गावालगत ११ के.व्ही विद्युत वाहिनीचे काम दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत झाले असून सदर विद्युत वाहिनी उभारण्याचे काम कंपनीच्या प्रचलित पध्दतीनुसार योग्य झाल्याचे दिसून आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखली (ता.आष्टी, जि.बीड) येथील शेतकऱ्यांना तूर आणि हरभऱ्याची रक्कम अदा करण्याबाबत

**(३४) * १३५४६७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (ता.आष्टी, जि.बीड) येथील चिखली सेवा सोसायटी लि. यांनी शासनाच्या आधारभूत किंमतीने शेतकऱ्यांकडून तूर, कुळीथ व हरभरा दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास खरेदी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सुमारे ५१६ शेतकऱ्यांची तूर आणि हरभऱ्याचे २ कोटी ९६ लाख रुपये अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना अदा करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना त्यांच्या धान्याची रक्कम त्वरीत अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) चिखली सेवा सोसायटी लि. या संस्थेने चिखली येथील खरेदी केंद्रावर तूर व हरभरा (चना) ची खरेदी दिनांक १/२/२०१८ ते १३/६/२०१८ पर्यंत केलेली आहे.

(२) होय.

(३) व (४) चिखली सेवा सोसायटी लि. या संस्थेने खरेदीमध्ये केलेल्या अनियमिततेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने विशेष लेखापरिक्षक वर्ग १, सहकारी संस्था (दुग्ध), कोल्हापूर यांच्याकडून चौकशी करण्याचे काम सुरु होते. तथापि, संबंधित संस्थेने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या रिट पिटिशनच्या अनुषंगाने, मा.उच्च न्यायालयाने चौकशीस स्थगिती दिली असून, शेतकऱ्यांचे पैसे न्यायालयात

जमा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याप्रमाणे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रु. २.८५ कोटी जमा केलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुर्यमाळ (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील आदिवासी आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने दारुच्या नशेत विदयार्थ्यांना केलेली मारहाण

**(३५) * १३८९४२ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) येथील सुर्यमाळ आदिवासी आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने दारुच्या नशेत वर्गखोलीचा दरवाजा बंद करुन सुमारे २५ ते ३० विदयार्थ्यांना शिवीगाळ करत मारहाण केली असल्याचे दिनांक १ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मारहाणीत अनेक विदयार्थी जखमी झाले असून काहींना रुग्णालयात दाखल करावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी मुख्याध्यापकावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) मोखाडा (जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळा, सुर्यमाळ येथील मुख्याध्यापक यांचा शालेय प्रशासकीय व्यवस्थापनात ढिसाळपणा व बेशिस्त वर्तणूक निदर्शनास आल्यामुळे अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचे स्तरावर संबंधित मुख्याध्यापकाविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## भिंगारा व चाळीसटापरी (ता.जळगाव जामोद, जि.बुलडाणा) येथील आदिवासी ग्रामस्थ मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(३६) * १३५१७४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंगारा व चाळीसटापरी (ता.जळगाव जामोद, जि.बुलडाणा) गावातील आदिवासी लोकांना स्वातंत्र्यप्राप्तीपासून कोणत्याही स्वरुपाच्या मुलभूत भौतिक सोयी-सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांनी सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्कार टाकल्याची बाब दिनांक १८ एप्रिल २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, भिंगारा व चाळीसटापरी (ता. जळगाव जामोद, जि बुलढाणा) या आदिवासी गावांना आवश्यक त्या मुलभूत भौतिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. अशोक उईके :** (१) खरे आहे.

(२) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली असता असे आढळून आले की, भिंगारा हे महसूली गाव असून येथे मुलभूत सोई-सुविधा पुरविण्याचे काम सुरु आहे, तर चाळीसटापरी हे महसूली गावाचा दर्जा नसलेले वन विभागाच्या जमिनीवर वसलेले गाव असल्यामुळे तेथे मूलभूत सुविधा पुरविण्यास अडचणी आलेल्या आहेत.

(३) भिंगारा या ठिकाणी आवश्यक मुलभूत भौतिक सुविधा पुरविणे सुरु असून चाळीसटापरी या गावास महसूली दर्जा प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव उपविभागिय अधिकारी, जळगाव जामोद यांचेकडून जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे काताळे (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील गौणखनिजाच्या उत्खननाबाबत

**(३७) * १३६७६० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काताळे (ता. गुहागर, जि.रत्नागिरी) येथील स.नं. १००/३ व ५४/१९ मध्ये जांभा दगड (डबर स्वरूपात) या गौणखनिजाचे बांधकामासाठी उत्खनन करण्याची परवानगी दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या आदेशान्वये शासनाकडून देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्खननाची परवानगी बांधकामासाठी असताना परवानाधारकांकडून सदर गौणखनिजाचा वापर सिमेंट उदयोग विक्रीकरिता होत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या पत्रान्वये खनिकर्म अधिकारी, रत्नागिरी जिल्हा यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, चौकशीमध्ये परवानाधारक दोषी आढळून आला असल्यास महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, दिनांक ११.०५.२०१५ च्या अधिसूचनेचे उल्लंघन करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी त्याच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) उक्त प्रकारची तक्रार मा.लोकप्रतिनिधी यांनी दि.२०/२/२०१९ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे केली होती.

(३) व (४) सदर गौण खनिजाचा वापर हा सिमेंट उद्योग विक्रीकरीता होत असल्याचे निदर्शनास आल्याने परवानाधारकास रुपये १६,२५,०००/- इतकी स्वामीत्वधन फरकाची रक्कम भरणा करण्याबाबत दि.२०/२/२०१९ रोजी कळविण्यात आले होते. त्यानुसार परवानाधारकाने दि.२८/२/२०१९ रोजी सदर रक्कम चलनाद्वारे शासनजमा केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाने शासकिय मान्यता नसलेल्या वसतीगृहांचे अनुदान रोखण्याचे दिलेले आदेश

**(३८) * १३६०३६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जातीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या खाजगी परंतू शासकीय अनुदानित ८५० वसतीगृहांना शासनाची मान्यता नसताना वर्षानुवर्षे अनुदान देण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येताच सामाजिक न्याय विभागाने शासकीय मान्यता नसलेल्या वसतीगृहांचे अनुदान रोखण्याचे आदेश सन २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.मंत्री व राज्यमंत्री, सामाजिक न्याय विभाग यांची समिती नेमून उक्त समितीस वसतीगृहांच्या मान्यतेचे अधिकार देण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीने सदर वसतीगृहे बंद करण्याऐवजी त्यांना मान्यता दर्शवून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडलेल्या अधिकाऱ्याने वसतीगृह संस्थांशी थेट संपर्क साधून ८०० वसतीगृहांना मान्यता देण्याची कार्यवाही पूर्ण करुन त्यांना प्रत्येक वर्षी १३० कोटी रुपये अनुदान मंजूर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालात काय आढळून आले व त्यानुषंगाने मान्यता नसलेल्या वसतीगृहांना अनुदान देण्याची कारणे काय आहेत,

(५) तसेच सदरचे अनुदान बंद करण्याबाबत व या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश खाडे :** (१) राज्यात काही वसतीगृहांकडे मुळ मान्यता आदेश नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे या वसतीगृहाची तपासणी होईपर्यंत वसतीगृहांचे अनुदान थांबविण्यात आले होते.

(२) होय.

(३) या वसतीगृहाच्या दस्तवेजाच्या तपासणीमध्ये नियमाप्रमाणे असल्याचे निदर्शनास आलेल्या ७९८ वसतीगृहाचे अनुदान वितरणाचे आदेश समितीच्या मान्यतेने आयुक्त, समाजकल्याण यांनी निर्गमित केलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील वसतिगृहांना अनुदान अदा करण्याबाबत

**(३९) * १३९५९३ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील ४५ वसतिगृहांना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून अदयापपर्यंत अनुदान देण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सुमारे १५२० विद्यार्थी लाभ घेत असलेली वसतीगृहे अनुदानाअभावी आर्थिक अडचणीत आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त वसतीगृहांना अनुदान अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश खाडे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही

-----------------

## रायगड जिल्हयात नाणार रिफायनरी हा महातेल शुध्दीकरण प्रकल्प सुरु करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**(४०) * १३४९८९ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील ग्रामस्थांनी केलेल्या प्रखर विरोधामुळे भूसंपादन रद्द करण्यात आलेला महातेल शुध्दीकरण प्रकल्प रायगड जिल्हयातील रोहा, अलिबाग, मुरुड व श्रीवर्धन या चार तालुक्यातील एकूण ४० गावात उभारण्याचा निर्णय घेऊन सिडकोची नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नेमणूक करुन सुमारे ४८०२०.६ एकर इतकी जमीन संपादनासाठी अधिसूचित केल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पास गावांतील नागरिकांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिफायनरी प्रकल्पाबाबत तेथील शेतकऱ्यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) रायगड जिह्यातील अलिबाग, मुरुड, रोहा व श्रीवर्धन या चार तालुक्यातील ४० गावातील सुमारे १३४०९.५२ हे.आर जमिनीवर एकात्मिक औद्योगिक वसाहत विकसीत करण्याचा सिडकोचा मानस आहे. सिडकोच्या प्रस्तावास अनुसरुन शासन अधिसूचना दि.१९.१.२०१९ अन्वये सदर क्षेत्र एकात्मिक औद्योगिक वसाहत नवनगर क्षेत्र म्हणून अधिसूचित करुन, अधिसूचित क्षेत्राचे विकासासाठी सिडकोची नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

नवनगर विकास प्राधिकरणांतर्गत अधिसूचित जमिनीचे भूसंपादन करण्याच्या अनुषंगाने भूमिअभिलेख जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयाकडून कागदपत्रे सिडकोकडून मागविण्यात आले असुन अद्याप ४० गावातील ग्रामस्थांनी भूसंपादनास विरोध केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच उद्योग विभागाच्या अभिप्रायानुसार सदर प्रकल्पास विरोध तसेच शेतकऱ्यांच्या मागण्या याबाबत कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे माळेगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील संपादित केलेल्या जमीनीचे संपादन रद्द करुन नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४१) * १३८२८४ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माळेगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील १५६ हेक्टर जमीन शासनाने औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित केल्या असून, सदर जमिनीचे अधिग्रहण केल्यामुळे शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर शासनाच्या नावाची नोंद झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर मोबदल्याचे शेतकऱ्यांना वाटप करतांना ज्या शेतकऱ्यांनी सहमती दिलेली आहे व ज्यांचे मोबदल्याचे पैसे शासनाने मंजूर केले आहेत त्यांच्यापैकी ठराविक लोकांना मोबदला दिला गेला असून काही शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत शासनाकडून टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या त्यांनाच मोबदल्यात रकमा मंजूर केल्या आहेत, परंतु मोबदला देण्यास शासनाने तांत्रिक कारणामुळे असमर्थता दर्शविली असल्याने अशा शेतकऱ्यांच्या जमिनींचे भूसंपादन रद्द करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन शासनाने संपादित केलेल्या जमिनीचे संपादन ३ वर्षानंतर रद्द करुन उक्त जमिनी शेतकऱ्यांना परत केल्यावर त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) मौजे-माळेगांव, ता.सिन्नर, जि.नाशिक येथील १५६.५५ हे. आर क्षेत्राच्या संपादनाकरिता म.औ.वि. अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण ६ च्या तरतुदी लागू करण्यासंबंधीच्या अधिसूचना दि. १०/०६/२०१६ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून त्यानुसार सदर क्षेत्रासंदर्भात ७/१२ उताऱ्यांवर इतर अधिकारात तशी नोंद घेण्यात आलेली आहे.

(२) मौजे-माळेगांव, (ता.सिन्नर, जि.नाशिक) या औद्योगिक क्षेत्रासाठी १५६.५५ हेक्टर क्षेत्र अधिसूचित करण्यात आले होते. त्यापैकी १३.४६ हे.आर. बागायती क्षेत्र वगळून उर्वरित १४३.०९५ हे.आर. इतके क्षेत्र संपादित करण्यात आले आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी सहमती दिलेली आहे, अशा एकूण ९३.९८ हे. आर क्षेत्राचा निवाडा उपविभागीय अधिकारी, निफाड यांनी केलेला असुन सदर निवाडयातील एकुण रक्कम रू. १३०,८५,७१,६९४/- रक्कमेपैकी ३५ कोटी म.औ.वि.म. ने नुकसान भरपाई पोटी उपविभागीय अधिकारी, निफाड यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

सदर नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अदा करण्याची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, निफाड यांचे मार्फत सुरु आहे व मोबदला देण्याचे टाळण्याचा शासनाचा हेतू नाही.

(३) व (४) मौजे-माळेगांव, (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील १५६.५५ हे. आर क्षेत्रापैकी १४३.०९५ हे. आर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमाच्या कलम ३२ (१) नुसार भूसंपादनाची कार्यवाही करण्यास मान्यता दिल्यानंतर सदर क्षेत्र सर्व भारापासून मुक्त होऊन शासनाच्या संपूर्णपणे निहित होते. त्यामुळे भूसंपादन रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच उपविभागीय अधिकारी, निफाड यांच्याकडून सदर क्षेत्रासंबंधांत करारनामे करून निवाडा करण्याबाबतची कार्यवाही सुरू असून नुकसान भरपाईची रक्कम वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वन हक्क कायदा २००६ अंतर्गत वन जमीन कसणा-या आदिवासी शेतक-यांना अद्यापपर्यंत पट्टे देण्यात आले नसल्याबाबत

**(४२) * १३७१३१ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन हक्क कायदा २००६ अंतर्गत वनांची जमीन कसणा-या आदिवासी शेतक-यांना अद्यापपर्यंत मोठया प्रमाणावर पट्टे देण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन हक्क कायदयाअंतर्गत अपात्र दाव्याबाबत पेशा भूमी अधिग्रहण ट्रायबल सब प्लॅनच्या अनुषंगाने सुमारे २२०० दावे प्रलंबित असल्याने आदिवासी समाजाला न्याय देण्यासाठी दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास हिंगोली जिल्हयातील लोकप्रतिनिधी व आदिवासी एकता परिषदेच्या संघटनेने आदिवासी विकास मंत्री व मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने राज्यातील आदिवासी समाजाला न्याय मिळावा यासाठी शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत दिनांक ३१ मे, २०१९ अखेरपर्यंत ३,७५,२८१ इतके वैयक्तिक व सामुहिक दावे ग्रामसभेकडे प्राप्त झाले आहेत.

त्यापैकी एकूण १,९०,७१८ इतके दावे व अपिले जिल्हास्तरीय समितीने अंतिमरित्या मान्य केले असून एकूण ३३,७२,२२५.४३ एकर वनक्षेत्र मंजूर केलेले आहे.

त्यानुसार मान्य दावे, अपिल व वनक्षेत्र यांचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.:-

| बाब | ग्रामसभे कडे प्राप्त दावे | अंतिमरित्या मान्य केलेले एकूण दावे, अपिल | | | मंजूर वनक्षेत्र (एकरमध्ये ) |
|---|---|---|---|---|---|
| | | मुळ दावे | अपिल दावे | एकूण | |
| वैयक्तिक दावे | २६३२४४ | १२१६८६ | ६१२८३ | १८२९६९ | ४१६३७१.५६ |
| सामुहिक | १२०३७ | ७७४० | ९ | ७७४९ | २९१०८५३.८७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दावे | | | | | |
| एकूण | ३७५२८१ | १२९४२६ | ६१२९२ | १९०७१८ | ३३२७२२५.४३ |

(२) हे खरे नाही.

(३) व (४) आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. वहका-२०१८/प्र.क्र.४३/का.१४, दि. ११ मे, २०१८ अन्वये राबविण्यांत येत असलेल्या विशेष "वनमित्र मोहिम" अंतर्गत प्रलंबित दावे व अपिले यांचा
निपटारा करण्यासंदर्भात कालबध्द कार्यक्रम निश्चित केलेला आहे. सदर कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांनी मोहिम स्वरुपात वनहक्कांचे निर्णय घेण्याबाबत आवश्यक ते नियोजन करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

प्रस्तुत वनमित्र मोहिमेच्या प्रगतीबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय आढावा घेण्यात येत आहे.

-----------------

## पेण अर्बन सहकारी बँकेतील (जि.रायगड) ठेवीदारांना देय रक्कम अदा करण्याबाबत

**(४३) * १३५९२७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पेण अर्बन सहकारी बँकेत माहे सप्टेंबर, २०१० मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या साडे नऊशे कोटी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणात मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या निर्णयानुसार गैरव्यवहाराशी संबंधित विविध १२५ बेनामी जमिनी व मालमत्ता जिल्हाधिकारी यांनी जप्त केल्या असून सदर मालमत्तेचे मुल्य थकीत ठेवीदारांच्या रकमेच्या अधिकपटीने असतानाही शासनाने १,९८,००० ठेवीदार ग्राहकांना अद्यापही देय रक्कम अदा केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांना रक्कम अदा करण्यासाठी, शासनाने माहे मार्च, २०१४ मध्ये सदरहू बँक अवसायनात पाठवण्याच्या जाहिर केलेल्या आदेशानुसार, ग्राहकांना किमान १ लाख रुपये त्वरीत मदत मिळणे शक्य असतानाही माहे जानेवारी, २०१५ मध्ये बँक अवसायनात पाठविण्याचा सदरहू

आदेश परस्पर रद्द केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुषंगाने उपरोक्त बँकेतील ठेवीदारांना देय रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) बँकेच्या लेखापरिक्षण अहवालानुसार बँकेच्या प्रशासक मंडळाने बँकेचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक मंडळ, लेखापरिक्षक, बँकेचे अधिकारी /कर्मचारी अशा एकूण ४१ व्यक्तींवर पेण पोलिस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा क्र.३४/२०११ दाखल केला असून सदर गैरव्यवहारातील रक्कम सुमारे ७४८ कोटी एवढी आहे.

वरील आर्थिक गैरव्यवहारामध्ये बँकेच्या ठेवीतून खरेदी केलेल्या ४७ मालमत्ता व तत्कालीन संचालकांच्या ९६ मालमत्ता अशा एकूण १४३ मालमत्ता एम.पी.आय.डी. कायदा, १९९९ मधील तरतूदीन्वये अधिसूचीत करण्यात आलेल्या आहेत.

(२) सहकार आयुक्तांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतूदीनुसार दिनांक २९.४.२०१४ रोजीच्या आदेशान्वये पेण अर्बन बँकेवर अवसायक मंडळाची नियुक्ती केली होती. सदर आदेशाविरुद्ध बँकेच्या प्रशासक मंडळाने तत्कालीन मा. मंत्री (सहकार) यांचेकडे अपील दाखल केले. सदर अपीलावरील सुनावणी दरम्यान  तत्कालीन मा. मंत्री (सहकार) यांनी त्यांच्या दिनांक ३०.१.२०१५ रोजीच्या आदेशान्वये सहकार आयुक्तांचा आदेश रद्द केला आहे. सद्यस्थितीत दिनांक २.२.२०१८ पासून विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली प्रशासक मंडळ कार्यरत आहे.

(३) बँकेने दिनांक २७.६.२०१७ पर्यंत १३,७२३ ठेवीदारांना रु. ४.९५ कोटींच्या ठेवी अदा केलेल्या आहेत. तसेच दिनांक २८.६.२०१७ पासून रु. १०,००० ते रु. २५,००० पर्यंत ठेवी असणाऱ्या ९,२९५ ठेवीदारांना रु. ११.९० कोटींच्या ठेवी अदा करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात महावितरणने वीज दरवाढ करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(४४) * १३४८८४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर),**

**श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणच्या वीज ग्राहकांसाठी दिनांक १ एप्रिल २०१९ रोजी वा त्यासुमारास ३ टक्के दरवाढ लागू करण्याचा निर्णय घेतलेला असताना राज्य वीज नियामक आयोगाने एकूण ६ टक्के वीज दरवाढ मंजूर केली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज ग्राहकांना गत ७ महिन्यांपासून तीन टक्के वीज दरवाढ महावितरणने स्पष्ट केली असली तरी प्रत्यक्ष वीज देयकात मात्र ६ टक्के इंधन समायोजन आकारले जात असून (एफएसी) लोकांची दिशाभूल करुन महावितरणने अंदाजे २५०० कोटी रुपयांची वसुली केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज दरवाढीनंतर इंधन समायोजन (एफएसी) शुन्य होणे आवश्यक असतानाही ग्राहकांना भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दरवाढीमुळे राज्यातील सर्वसामान्य वीज ग्राहकांमध्ये विशेषतः ग्रामीण भागात तीव्र असंतोष निर्माण झाल्यामुळे ही दरवाढ रद्द करण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी महावितरण वीज कंपनीकडे व ऊर्जा मंत्री यांच्याकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू वीज दरवाढ कमी करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या वीजदर आदेशानुसार महावितरणमार्फत सुधारित वीजदर दिनांक १ सप्टेंबर, २०१८ पासून लागू करण्यात आले आहेत. सदर आदेशानुसार आर्थिक वर्ष २०१९-२० साठी दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून लागू झालेल्या दरात आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या तुलनेत साधारणत: ३ टक्के वीज दरवाढ झाली आहे.

(२) व (३) हे खरे नाही. मा. आयोगाने वीज दर आदेशात मंजूर केलेल्या वीज खरेदी दरापेक्षा प्रत्यक्षातील वीज खरेदी दर हा जास्त झाल्यास अशा अधिकच्या/वाढीव खर्चाची वसुली बहुवर्षीय वीजदर विनियमातील तरतुदीनुसार इंधन समायोजन आकाराच्या (FAC) माध्यमातून करण्यात येते. दर महिन्यात प्रत्यक्षात वीज खरेदी खर्च परिस्थितीनुसार वेगवेगळा असल्यामुळे मंजूर वीज खरेदी खर्च व प्रत्यक्षात झालेला वीज खरेदी खर्च यामधील फरकाची रक्कम वेगवेगळी असते, परिणामी दर महिन्यात निर्धारित होणार इंधन समायोजन आकारही वेगवेगळा असतो.

(४) अशा आशयाचे पत्र महावितरण कंपनीकडे किंवा शासनाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील स्पॅन्को कंपनी आणि मे.एस्सेल समूहाकडे असलेली थकबाकी वसुल करण्याबाबत

**(४५) * १३७३७३ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील वीज वितरण व्यवस्था करण्याचे कंत्राट महावितरणने सन २०१० मध्ये स्पॅन्को कंपनीला दिले असता सदर कंपनीकडे महावितरणची सुमारे २०० कोटी रुपयांची थकबाकी असल्याची बाब दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महावितरणने स्पॅन्को कंपनीकडील थकबाकी रक्कम वसूल न करताच दिनांक १ सप्टेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास एस्सेल समूहाला नागपूर शहरातील वीज वितरण व्यवस्था करण्याचे कंत्राट दिले असता मे.एस्सेल समूहाकडे देखील महावितरणची अंदाजे १०० कोटी रुपयांची थकबाकी असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर थकीत रक्कम संबधित कंपन्यांकडून वसूल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** : (१) दिनांक ३१.०५.२०१९ रोजी महावितरणची मे.एस.एन.डी.एल. कंपनी या फ्रेंचायजी कंपनीकडे सुमारे रु.९३.२१ कोटी इतकी थकबाकी शिल्लक आहे.

(२) हे खरे नाही. सन २०१२ मध्ये स्पॅन्को कंपनीकडे असलेल्या महावितरणच्या संपूर्ण रु.२३० कोटी रकमेच्या थकबाकीचा मे. एस्सेल समूहाने भरणा केला व तद्नंतर सुरक्षेच्या पोटी समूहाकडून रु.१०० कोटींचे बँक हमीपत्र घेण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील अंबड औद्योगिक वसाहतीत अग्निशमन केंद्र सुरु करण्याबाबत

**(४६) * १३६७४४ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करुन अग्निशमन केंद्राची इमारत बांधण्यात आली असून कर्मचाऱ्यांअभावी अद्याप इमारत कार्यान्वित करण्यात आलेली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त औद्योगिक वसाहतीमध्ये अग्निशमन केंद्राअभावी गत ५ वर्षात पंधरा उद्योगांना आगीच्या दुर्घटनेस सामोरे जावे लागले असून तेथील उद्योगांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अग्निशमन केंद्रास कर्मचारी उपलब्ध करुन देवून कार्यान्वित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी लेखी निवेदनान्वये मा.उद्योग मंत्री यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये कर्मचारी उपलब्ध करुन देऊन अग्निशमन केंद्र त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) गत ५ वर्षात अंबड औद्योगिक क्षेत्रात छोट्या-मोठ्या ५४ आगीच्या दुर्घटना घडलेल्या असून, त्यामध्ये जवळपास ५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महामंडळामार्फत महापरिक्षा या संस्थेमार्फत भरती प्रक्रियासंबंधीची कार्यवाही करण्यात येत आहे. दरम्यानच्या कालावधीत राज्याच्या अग्निप्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षित झालेल्या प्रशिक्षणार्थींच्या सेवा करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन अग्निशमन केंद्र सुरु करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) येथील आदिवासी विकास प्रकल्प विभागात झालेला गैरव्यवहार

**(४७) * १३८९७३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील आदिवासी विकास प्रकल्प विभागाला शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीमधून विविध योजनांवर खर्च करताना सुमारे २० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब दिनांक २ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित अधिका-यांविरुध्द पेण पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने संबधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय.

न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये नमूद दोषी अधिकारी/कर्मचारी आणि संस्थांविरुध्द संबंधित पोलिस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, त्याचबरोबर अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीस सुरूवात करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील शेतकऱ्यांना तुरीचे पैसे देण्याबाबत

**(४८) * १३५४६८ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील शेतकऱ्यांची तूर माहे मार्च, एप्रिल व मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान नाफेडने खरेदी केली असून, सदर विक्री केलेल्या तुरीचे पैसे अद्यापपर्यंत देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तुरीचे पैसे मिळण्याबाबत संबंधीत शेतकऱ्यांनी मा.कृषी मंत्री, उपविभागीय अधिकारी, व तहसिलदार, वसमत यांना दिनांक २७ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना त्यांच्या तुरीचे पैसे त्वरीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) हंगाम २०१७-२०१८ मध्ये हिंगोली जिल्ह्यात ५ खरेदी केंद्रावर तूर व हरभरा (चना) ची खरेदी करण्यात आली आहे. वसमत खरेदी केंद्रावर ९२७ शेतकऱ्यांची ८१०८.५० क्विंटल तूर खरेदी करण्यात आली असून, त्यापैकी २४ शेतकऱ्यांकडून उत्पादकतेपेक्षा जास्त खरेदी केल्यामुळे व त्यांची विहीत मुदतीत लॉट एन्टी न केल्यामुळे,त्या शेतकऱ्यांना चुकारे अदा करण्यात आले नाहीत.

यासंदर्भात सर्व शेतकऱ्यांच्या यांद्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांच्याकडून पडताळणी करुन घेतल्या असून चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिंगळोली (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील आशापुरा माईनकेम कंपनीकडून विनापरवाना बॉक्साईटचे होत असलेले उत्खनन

**(४९) * १३७६५३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंगळोली (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील आशापुरा माईनकेम कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जमिनीत विना परवाना बॉक्साईट उत्खनन व साठा केल्याची बाब माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी सदर कंपनीने शेतकऱ्यांच्या जमिनीचे केलेले नुकसान व स्वामित्वधन चुकवून शासनाची

फसवणूक झाल्याच्या लेखी तक्रारी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच आशापुरा माईनकेम कंपनीने स्वामित्वधन चुकवून विनापरवानगी बॉक्साईट उत्खनन केल्याबाबत शासनाने सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) मौजे भिंगळोली ता. मंडणगड या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे बॉक्साईट उत्खनन करण्यात येत नाही.

मौजे भिंगळोली ता.मंडणगड येथील सर्व्हे न./ हि.न. ९/२/२ व ९/३ मध्ये साठा करण्यासाठी श्री.बाळकृष्ण सदाशिव जाधव आणि दिगंबर सडकोजी जाधव, रा. मौजे भिंगळोली ता. मंडणगड यांनी ५ वर्षाच्या भाडेपट्टयाने मे. आशापुरा माईन केम लि. कंपनीला भाड्याने देण्यात आलेला आहे.

मे. आशापुरा माईन केम लि. यांना उपसंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, कोल्हापूर यांसकडून त्यांच्या दिनांक २८.०५.२०१८ अन्वये ३ वर्षाकरता मौजे भिंगळोली ता. मंडणगड येथील सर्व्हे न./ हि.न. ९/२/२ व ९/३ मध्ये साठा करण्यासाठी खनिज विक्रेता परवानगी मंजूर करण्यात आली आहे. बॉक्साईट साठा हा आशापुरा माईन केम लि. यांना मंजूर असलेल्या दापोली तालुक्यातील उंबरशेत येथील ९९.८६.१९ हे.आर क्षेत्रामध्ये व मौजे रोवले येथील २१८.२८.५९ हे. आर क्षेत्रामध्ये केलेल्या बॉक्साईट उत्खननापैकी आहे.

(२) मौजे भिंगळोली ता. मंडणगड, जि. रत्नागिरी या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे बॉक्साईट उत्खनन करण्यात येत नसून सदर प्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, मंडणगड यांनी दिनांक २४.१२.२०१८ रोजी तक्रारदार ग्रामस्थ यांसोबत समाधानकारक चर्चा झाल्याने सदर अर्ज निकाली काढण्यात आला.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणेगाव (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथील ३३ केव्ही विजेच्या धक्क्याने एका युवकाचा झालेला मृत्यू

**(५०) * १३७१७४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणेगाव (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथील आरमोरी-गडचिरोली दरम्यान ३३ केव्ही विद्युत वाहिनी जोडणीचे काम सुरु असताना खांबाचा विद्युत तारांना स्पर्श झाल्याने शॉक लागून श्री.सुनील दादाजी मेश्राम या मजुराचा मृत्यू झाला असून तीन मजूर गंभीर जखमी झाल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मृत व्यक्तींच्या कुटुंबास तसेच जखमी झालेल्या मजुरांना आर्थिक मदत देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर कामाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या मजूरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसून काम सुरू असतांना संबधित विभागाचा एकही अभियंता उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. दिनांक २७.०४.२०१९ रोजी ३३ के.व्ही. गडचिरोली-आरमोरी विद्युत वाहिनीचे काम करताना खाजगी कंत्राटदाराच्या एका मजूरास प्राणांतिक व इतर तिघांना अप्राणांतिक अपघात झालेला आहे.

(२) महावितरणचे उपविभागीय कार्यालय, आरमोरी यांच्याकडून मृत व्यक्तीच्या कुटुंबास रु.२०,०००/- तातडीची आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. तसेच विद्युत निरीक्षक, गडचिरोली यांनी मृताच्या वारसास व

अपघातग्रस्तास नुकसान भरपाई देण्याबाबत कंत्राटदारास दिनांक २३.५.२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) विद्युत निरीक्षक, गडचिरोली यांनी सदर विद्युत अपघाताची चौकशी केली असून त्यानुसार सदर कामाच्या ठिकाणी कंत्राटदाराने महावितरण कंपनीस कोणतीही पूर्वसूचना न देता ३३ के.व्ही. जिवंत विद्युत वाहिनीमध्ये कोणत्याही सुरक्षा साधनांचा वापर न करता परस्पर पोल उभा करीत असताना सदर अपघात घडला असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) कंत्राटदार कंपनीच्या मालकास विद्युत निरिक्षक, गडचिरोली यांच्यामार्फत दि. २३.५.२०१९ नुसार नोटीस बजाविण्यात आलेली आहे. तसेच याप्रकरणी महावितरण कंपनीतर्फे पोलीस स्टेशन, आरमोरी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास आयुक्त नाशिक यांचे तर्फे सुगंधी दुध खरेदी ऑनलाईन निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(५१) * १३६०६५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५२८ आश्रमशाळांसाठी दररोज ४५ हजार लिटर प्रमाणे सुगंधी दुध खरेदी करण्यासाठी आदिवासी विकास आयुक्त नाशिक यांचे तर्फे मागविण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा प्रक्रियेत निविदा भरण्यासाठी दिनांक २८ जानेवारी, २०१९ हा अंतिम दिनांक असताना सदर प्रक्रियेत तांत्रिक व व्यापारी लिफाफा दोन दिवस उशिरा बंद केल्याने महानंद डेअरीने भरलेल्या दुधाच्या दराची माहिती निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच उघडकीस आली असल्याचे निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निविदा प्रक्रित झालेला गैरप्रकार व गैरव्यवहाराची बाब दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू संपूर्ण निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी 'महानंद डेअरी' व्यवस्थापनाने, शासन तथा आदिवासी विकास आयुक्तांकडे केली आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच तद्नुसार संबधित दोषींविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोक उईक :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) याबाबत चौकशी करण्याची मागणी महानंद डेअरी यांनी केली होती. परंतु, सदर निविदा प्रक्रिया ऑनलाईन स्वरुपाची असल्याने यामध्ये मानवी हस्तक्षेपास वाव नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

चारही निविदाकारांनी इतर स्पर्धक निविदाकारांविषयी आक्षेप नसल्याचे लेखी कळविल्यानंतर दिनांक ०६/०६/२०१९ रोजी सदर निविदा प्रक्रियेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आलेला आहे व त्यानुसार न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील तूर खरेदी केंद्रे सुरु करण्याबाबत

**(५२) * १३४९६६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर),**

**श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतकऱ्यांकडून तूर खरेदी करण्याचा निर्णय घेऊन तूरीला प्रति क्विंटल ५,६७५/- रुपये इतका हमी भाव जाहिर केला असल्याचे दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नाफेड मार्फत तूर विक्री करता यावी, याकरिता शेतकऱ्यांनी हंगामाचे पेरीव पत्र, बँक पास बूक व आधार कार्ड देऊन नोंदणी केली, परंतू राज्यातील सर्वच बाजार समितीमध्ये स्थायी, अस्थायी व हंगामी कर्मचाऱ्यांनी आंदोलन पूकारल्यामुळे तूर खरेदी बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तूर खरेदी केंद्रे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिदे :** (१) होय.

(२), (३) व (४) राज्यातील ३०७ कृषि उत्पन्न बाजार समित्यामधील कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत बाजार समित्यांनी दिनांक २८/२/२०१९ पासून बंद पुकारलेला होता.सदर बंद दिनांक १/३/२०१९ रोजी मागे घेण्यात आलेला आहे.

राज्यात हमीभावाने तूरखरेदी करण्यासाठी दिनांक १७/१/२०१९ पासून ऑनलाईन नोंदणी सुरु करण्यात आली होती आणि प्रत्यक्ष खरेदी दिनांक ७/२/२०१९ पासून सुरु करण्यात आलेली होती. खरेदीच्या एकूण कालावधीत एकूण ५४६२७ शेतकऱ्यांकडून ५३९८९९.४१ क्विंटल तूरीची खरेदी करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महावितरणने वाढीव वीज शुल्क ग्राहकांकडुन वसूल करण्याचा घेतलेला निर्णय

**(५३) * १३७२८९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत वर्षी विजेच्या जादा मागणीच्या कालावधीत बाहेरुन खरेदी केलेल्या विजेचा मोबदला म्हणून ३५० कोटी रुपयांचा अधिक भार वीज ग्राहकांवर लादण्याचा निर्णय महावितरणने घेतला असून त्यानुसार माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान प्रत्येक विज ग्राहकांकडून १५० रुपयांचे वाढीव शुल्क आकारण्यात येत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, ग्राहकांकडून वाढीव वीज शुल्क वसूल न करता महावितरणने स्वत: त्यांची जबाबदारी उचलावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य वीजग्राहक संघटनेकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी महावितरणने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. सप्टेंबर, २०१८ व ऑक्टोबर, २०१८या महिन्यांमध्ये पुर्वानुमानित वीज मागणीपेक्षाही वीजेच्या मागणीत झालेली अधिकची वाढ व कोळशाच्या आत्यंतिक तुटवडयामुळे करारीत स्त्रोतांमधील वीज उपलब्धतेत अधिकची तूट निर्माण झाली होती.

माहे सप्टेंबर, २०१८ व ऑक्टोबर, २०१८ मध्ये जादा दराने खरेदी केलेल्या वीजदराच्या फरकातील आकारणी ग्राहकांच्या डिसेंबर, २०१८ व जानेवारी, २०१९ च्या वीज देयकातून इंधन समायोजन आकाराच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. सदर आकारणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनुसार करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.